RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ


उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

सोमवार, २२ डिसेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २७३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday, 22 December 2025 | Year : 5 | Issue : 273 | Daily | Rate: Rs. 5/-

# संपूर्ण निकालावरच प्रश्नचिन्ह



**मुंबई :** नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्रातील नगरपरिषदांच्या निकालावर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते, संजय राऊत यांनी वेगळाच तर्क लावला आहे. तेच आकडे आहेत. मशिन तशीच सेट आहे, असे म्हणत त्यांनी हा विचारांचा विजय नाही, हा पैशांचा विजय आहे. हा सत्तेच्या दहशतीचा विजय असल्याचे म्हटले आहे. ते मुंबईत पत्रकारांसोबत बोलत होते. नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपचे सर्वाधिक नगराध्यक्ष निवडून आले आहेत, त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे निवडून आले आहेत? असे विचारले असता राऊत म्हणाले, *'जर आपण विधानसभेचे निकाल बघितले असतील, तर तेच आकडे आहेत. मशिन तशीच सेट आहे. 120-125 भारतीय जनता पक्ष, 54 विधानसभेला आणि येथेही आणि 40-42 अजित पवार, आकडे तेच आहेत ना. त्याच मशीन तेच सेटिंग कायम आणि तोच पैसा, ही आपली लोकशाही आहे. आपण आकडे बघाना. आकड्यांमध्ये अजिबात बदल झालेला नाही. भारतीय जनता पक्षाने मशीन त्याच पद्धतीने सेट केल्या. तेच आकडे रहायला हवेत. आकडे तरी बदलायला हवे होते. यामुळे पैशांची जी गारपीट झाली, त्या गारपिटीपुढे कोण टिकणार? आम्ही पेरलेली शेतही त्याखाली झोपले गेली.'* हा विचारांचा विजय नाही, हा पैशांचा विजय, सत्तेच्या दहशतीचा विजय 'नगरपालिका निवडणुकीत चपराक वैगेरे काही नसते. पैशांचा खेळ आहे. सत्तेचा खेळ आहे. माणसांची फोडाफोडी शेवटपर्यंत सुरू आहे. अत्ताच निवडून आलेले नगराध्यक्ष ताबडतोब फोडण्याचा प्रयत्न सुरू झाला. आज श्रवर्धनला शिवसेनेचा नगराध्यक्ष निवडून आला आणि तुम्ही लगेच पैशांच्या बळावर तो फोडण्याचा प्रयत्न करता. ही तुमची नियत आहे. हा कसला विचार. हा विचारांचा विजय नाही, हा पैशांचा विजय आहे. हा सत्तेच्या दहशतीचा विजय आहे आणि हे फार काळ चालत नाही,' असेही राऊतांनी म्हटले आहे.

***वंचित बहुजन आघाडीचे***
***55 नगरसेवक 5 नगराध्यक्ष*!**
***बदलतं राजकारण अभिनंदन***

## बच्चू कडूंच्या प्रहारचा चांदूरबाजारमध्ये झेंडा

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यात माजी राज्यमंत्री बच्चू कडू प्रहार जनशक्ती पक्षाला फारशी चांगली कामगिरी करता आली नसली, तरी चांदूर बाजार नगरपालिकेत स्पष्ट बहुमत मिळवून सत्ता हस्तगत केली आहे. चांदूरबाजारमध्ये नगराध्यक्षपदी प्रहार जनशक्ती पक्षाच्या उमेदवार मनीषा नांगलिया या निवडून आल्या असून त्यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या उमेदवार कांताबाई अहीर यांचा 815 मतांनी पराभव केला. मनीषा नांगलिया यांना 5 हजार 81 मते तर कांताबाई अहीर यांना 4 हजार 266 मते प्राप्त झाली. सदस्यपदांपैकी 12 जागा प्रहारने जिंकल्या असून भाजपला 3, काँग्रेसला 1, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला 1, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला 1 तर अपक्षांना दोन जागा मिळाल्या आहेत.

## धुळ्यात भाजपाचा ऐतिहासिक विजय

**धुळे :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर-वरवाडे नगर परिषदेच्या निवडणुकीत तब्बल 40 वर्षांनंतर भाजपाने ऐतिहासिक यश मिळवत सत्ता स्थापन केली. मात्र, यंदाच्या निवडणुकीत मतदारांनी स्पष्ट कौल देत भाजपाला बहुमत बहाल केले आहे. सन 2019 मध्ये शिरपूरचे आमदार अमरीशभाई पटेल यांनी काँग्रेसला रामराम ठोकत भाजपात प्रवेश केला. त्यानंतर शिरपूर शहर आणि परिसरात भाजपाची संघटनात्मक ताकद वाढत गेली. या पार्श्वभूमीवर झालेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपाने घवघवीत यश मिळवले असून नगरपालिकेच्या एकूण 32 जागांपैकी तब्बल 31 जागांवर भाजपाचे नगरसेवक निवडून आले आहेत. उर्वरित एकमेव जागा एमआयएम पक्षाला मिळाली आहे.

## भाजपा नेते मुनगंटीवार संतप्त

चंद्रपूर जिल्ह्यात भाजपचा दारूण पराभव झाल्याने माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. याच अस्वस्थतेतून मुनगंटीवार यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देतांना संताप व्यक्त केला आणि चिंतन करावे लागेल अशीही भावना व्यक्त केली.



"राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचाय निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल प्रदेशाअध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि समस्त कार्यकर्त्यांचे अभिनंदन. हा कार्यकर्त्यांचा विजय आहे. भाजपच्या विकासाभिमुख कार्यशैलीवर विश्वास कायम ठेवत भाजपला साथ दिलेल्या जनतेचे आभार. - **नितीन गडकरी**

## बारामतीत बसपाची नगरसेवक

पुणे जिल्ह्याच्या बारामती नगर परिषदेत कुमारी संघमित्रा काळूराम चौधरी या निवडून आलेल्या आहेत. संघमित्रा चे वडील काळूराम चौधरी हे बसपाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव असून बारामतीत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार होते. त्यांचा पराभव झाला असला तरी त्यांची मुलगी संघमित्रा ही प्रभाग क्रमांक 14 अ येथून निवडून आलेली आहे.

## नगराध्यक्ष डॉ. नयना उमेश तुळसकर सर्वाधिक मतांनी विजयी

**वर्धा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारदरम्यान भरभरून प्रशंसा केलेल्या डॉ. नयना उमेश तुळसकर या हिंगणघाटच्या नगराध्यक्ष म्हणून प्रचंड मतांनी निवडून आल्या आहेत. त्यांना 30 हजार 600, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या शुभांगी डोंगरे - 12 हजार 500, उभाठाच्या नीता धोबे - 6 हजार 500 व राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या योगिता घुसे यांना 4 हजार 400 वर मते पडली आहे. हा भारी फरक ठरला असून भाजपच्या नयना तुळसकर 18 हजारावर मतांनी विजयी ठरल्या आहे. त्या जिल्ह्यात सर्वाधिक मतांनी विजयी झाल्या असून कदाचित विदर्भात पण सर्वाधिक मते घेणाऱ्या विजयी उमेदवार ठरल्यात.

## नागपूर जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणूक निकाल

1) कामठी नगरपरिषद - भाजपचे अजय अग्रवाल विजयी
2) उमरेड नगरपरिषद - भाजपच्या प्राजक्ता कारु विजयी
3) काटोल नगररिषद - शेकाप व राष्ट्रवादी (शरद पवार) आघाडीच्या अर्चना देशमुख विजयी
4) वाडी नगरपरिषद - भाजपचे नरेश चरडे विजयी
5) डिगडोह देवी नगरपरिषद - भाजपच्या पुजा अंबादास उके विजयी
6) नरखेड नगरपरिषद - भाजपचे मनोज कोरडे विजयी
7) सावनेर नगरपरिषद - भाजपच्या संजना मंगळे विजयी
8) कळमेश्वर नगरपरिषद - भाजपचे अविनाश माकोडे विजयी
9) रामटेक नगरपरिषद - शिंदेसेनेचे बिकेंद्र महाजन विजयी
10) बुटीबोरी नगरपरिषद - कॉग्रेस समर्थित गोंडवाणा गणतंत्र पार्टीचे सुमित मेंढे विजयी
11) मोहपा नगरपरिषद - कॉग्रेसचे माधव चर्जन विजयी
12) खापा नगरपरिषद - भाजपचे पियुष बुरडे विजयी
13) मोवाड नगरपरिषद - भाजपच्या दर्शना ढोरे विजयी
14) वानाडोंगरी नगरपरिषद - भाजपच्या सुनंदा बागडे विजयी
15) कन्हान-पिंपरी नगरपरिषद - भाजपचे राजेंद्र शेंदरे विजयी
16) महादुला नगरपंचायत - भाजपच्या हेमलता ठाकूर विजयी
17) मौदा नगरपंचायत - भाजपचे प्रसन्ना तिडके विजयी
18) भिवापूर नगरपंचायत - भाजपच्या सुषमा श्रीरामे विजयी
19) बहादुरा नगरपंचायत - भाजपच्या प्रतीक्षा खंदाडे विजयी
20) कांद्री-कन्हान - भाजपचे सुजित पानतावणे विजयी
21) बिडगाव तरोडी नगरपंचायत - भाजपचे विरु जामगडे विजयी
22) बेसा-पिपळा नगरपंचायत - भाजपच्या किर्ती बडोले विजयी
23) पारशिवनी नगरपंचायत - शिंदेसेनेच्या सुनीता प्रकाश डोमकी विजयी
24) नीलडोह नगरपंचायत - भाजपच्या भूमिका विजयी
25) कोंढाळी नगरपंचायत - भाजपचे योगेश चाफले विजयी
26) गोधणी (रेल्वे) नगरपंचायत - भाजपच्या रोशना कोलते विजयी
27) येरखेडा नगरपंचायत- भाजपचे राजकिरण बर्वे विजयी

## मुख्यमंत्र्यांच्या सभेनंतरही मंत्र्यांच्या पत्नीचा पराभव

**जळगाव :** जिल्ह्यातील नगर परिषदांच्या निवडणुकीत वर्चस्वासाठी प्रयत्नशील असलेल्या भाजपला भुसावळमध्ये पराभवाचे तोंड पाहवे लागले आहे. त्या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा झाल्यानंतरही नगराध्यक्षपदाच्या उमेदवार मंत्री संजय सावकारे यांच्या सौभाग्यवती रजनी सावकारे यांचा 1800 पेक्षा अधिक मतांनी पराभव राष्ट्रवादीच्या (शरद पवार) गायत्री भंगाळे-गौर यांनी केला आहे.

# लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्माच्या घरी CBI ची धाड

**नवी दिल्ली :** केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयने शनिवारी संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सुरक्षा उत्पादन विभागात कार्यरत असणाऱ्या लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा यांना लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक केली. बंगळुरूमधील कंपनीकडून त्यांनी कथितरित्या तीन लाख रुपयांची लाच घेतल्याचा आरोप करण्यात येत आहे. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, शर्मा यांच्या घराची झडती घेतली असता तिथे 2.23 कोटी रुपयांची रोकड आढळून आली. संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहयोग आणि निर्यात प्रकरणांशी संबंधित डेप्युटी प्लॅनिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असलेले लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा आणि त्यांची पत्नी कर्नल काजल बाली यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

कर्नल बाली या सध्या राजस्थानच्या श्री गंगानगर येथील 16 इन्फंट्री डिव्हिजन ऑर्डिनन्स युनिटमध्ये कमांडिंग ऑफिसर म्हणून तैनात आहेत.

कंपन्यांना लाभ मिळवून दिल्याचा आरोप सीबीआयच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, लेफ्टनंट कर्नल शर्मा हे संरक्षण उत्पादनांचे निर्माण आणि निर्यातीशी जोडल्या गेलेल्या अनेक खासगी कंपन्यांशी संगनमत करून फौजदारी गुन्ह्यांशी संबंधित कारवायांमध्ये गुंतले होते. सीबीआयने केलेल्या आरोपानुसार, कंपन्यांना लाभ मिळवून देण्याच्या बदल्यात शर्मा यांनी रोख रक्कम घेतली होती. बंगळुरू स्थित एका कंपनीकडून शर्मा



यांना रोकड मिळणार असल्याची माहिती सीबीआयच्या हाती लागली होती.18 डिसेंबर 2025 रोजी या कंपनीच्या इशाऱ्यावर विनोद कुमार नामक व्यक्तीने दीपक कुमार शर्मा यांना 3 लाख रुपयांची लाच दिली. शर्मा यांच्या दिल्लीस्थित घरात झडती घेतली असता 2.23 कोटी रुपयांची रोकड आणि लाच म्हणून स्वीकारलेले 3 लाख रुपये आढळून आले आहेत.

# मक्यापासून इथेनॉल निर्मितीचा उच्चांक!

**मुंबई :** केंद्र सरकारच्या ई – 20 इथेनॉल धोरणामुळे देशभरात इथेनॉल निर्मितीला चालना मिळाली आहे. उसाचा रस, पाक, मळी, मका आणि अन्नधान्यांपासून इथेनॉल निर्मिती होत असली तरीही मका इथेनॉल निर्मितीचा मुख्य स्त्रोत म्हणून समोर येत आहे. आर्थिक वर्ष 2024 – 25 मध्ये 125 लाख टन मक्यापासून 430 कोटी लीटर इथेनॉल निर्मिती झाली असून, एकूण उत्पादनातील वाटा 45 टक्क्यांवर गेला आहे. केंद्र सरकारने प्रथम 2030 पर्यंत पेट्रोलमध्ये 20 टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट्ये ठेवले होते. पण, इथेनॉल उत्पादनाचा वेग वाढल्यामुळे त्यात सुधारणा करून 2025 पर्यंत 20 टक्के मिश्रणाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आले. नोव्हेंबर 2025 मध्येच हे उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यात यश आले आहे. त्यात मका पिकाने मोठी भूमिका पार पाडली आहे. देशात उसाचा रस, पाक, साखर, मळीसह मका, तुकडा तांदळासह निकृष्ट दर्जाच्या तांदूळ,



बाजरी, गव्हापासून इथेनॉल निर्मिती केली जात आहे. त्यात मक्यापासून इथेनॉल निर्मितीला मोठी गती आली आहे. मका वर्षात कधीही घेता येणारे पीक आहे. उत्पादन, साठवणूक आणि वाहतूक सोयीची असल्यामुळे उद्योगाकडून मक्याला प्राधान्य दिले जात आहे. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, तेलंगणा, उत्तर प्रदेश ही प्रमुख मका उत्पादक राज्ये आहेत. आर्थिक वर्ष 2024 - 25 मध्ये 125 लाख टन मक्यापासून 430 कोटी लीटर इथेनॉल निर्मिती झाली असून, एकूण उत्पादनातील वाटा 45 टक्क्यांपर्यंत गेला आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### इस्त्रो अमेरिकेचा आधुनिक उपग्रह अवकाशात पाठवणार

**बंगलोर :** इस्त्रोने अवकाश क्षेत्रात एक प्रतिष्ठा निर्माण केली आहे, जगभरातील देशांमध्ये इस्त्रोकडून उपग्रह प्रक्षेपण करण्यास आघाडी घेतली आहे. इस्त्रो आता अमेरिकन कंपनी एएसटी स्पेस मोबाइलकडून एक महत्त्वाचा उपग्रह प्रक्षेपित करण्याची तयारी करत आहे. इस्त्रो त्यांच्या आगामी LVM3 M6 मोहिमेद्वारे 24 डिसेंबर रोजी अमेरिकन कंपनीचा कम्युनिकेशन उपग्रह, ब्लूबर्ड ब्लॉक-2 प्रक्षेपित करेल. एएसटी स्पेसमोबाइल पहिले आणि एकमेव अवकाश-आधारित सेल्युलर ब्रॉडबँड नेटवर्क तयार करत आहे, जे स्मार्टफोनवरून थेट ॲक्सेस करता येते आणि व्यावसायिक आणि सरकारी वापरासाठी डिझाइन केलेले आहे. 'आम्ही जवळजवळ सहा अब्ज मोबाइल ग्राहकांसमोरील कनेक्टिव्हिटी अंतर दूर करण्यासाठी आणि अजूनही कनेक्ट नसलेल्या अब्जावधी लोकांपर्यंत ब्रॉडबँड पोहोचवण्याच्या मोहिमेवर आहोत,' असे कंपनीने त्यांच्या वेबसाइटवर म्हटले आहे.

### 26 डिसेंबरपासून रेल्वे प्रवास महागणार

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने रेल्वे प्रवाशांसाठी एक मोठी घोषणा केली आहे. रेल्वे भाड्यात सुधारणा 26 डिसेंबर 2025 पासून लागू होतील. या निर्णयाचा देशभरातील लाखो प्रवाशांवर परिणाम होईल. तथापि, कमी अंतराच्या प्रवाशांना दिलासा देण्यासाठी, रेल्वेने 215 किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी भाडे न वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. दैनंदिन प्रवाशांच्या हितासाठी, उपनगरीय गाड्या आणि मासिक हंगामी तिकिटांच्या किमतींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. रेल्वेच्या म्हणण्यानुसार, सामान्य वर्गात 215 किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी कोणतेही अतिरिक्त भाडे आकारले जाणार नाही. यामुळे दैनंदिन प्रवासी आणि कमी अंतराच्या प्रवाशांवर भार पडणार नाही. रेल्वेने म्हटले आहे की हा निर्णय सर्वसामान्यांना लक्षात घेऊन घेण्यात आला आहे.

# 'घृणास्पद जिहादी तमाशा' : बांगलादेशी लेखिका तस्लीमा नसरीन

**नवी दिल्ली :** बांगलादेशमध्ये एका हिंदू युवकाची जमावाने मारहाण करत निर्घृण हत्या केली. या हत्येनंतर दोन्ही देशांत खळबळ उडाली आहे. भारतातून या हत्येचा निषेध करण्यात येत आहे. ईशनिंदेचा आरोप करत कापडाच्या कारखान्यात काम करणाऱ्या दीपू चंद्र दास या तरूणाची हत्या करून त्याला झाडाला बांधून जाळण्यात आले होते. या हत्येनंतर भारतात आश्रय घेतलेल्या बांगलादेशच्या लेखिका तस्लीमा नसरीन यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. मैमनसिंग येथील कारखान्यात काम करत असलेल्या 25 वर्षीय दीपू चंद्र दासला त्याच्या मॅनेजरने राजीनामा देण्यास भाग पाडले आणि नंतर त्याला जमावाच्या स्वाधीन केले. तस्लीमा नसरीन यांनी एक्सवर याबाबत एक पोस्ट शेअर केली आहे. त्यात त्या म्हणाल्या,



'दीपू चंद्र दास मैमनसिंगमधील भालुका येथील एका कारखान्यात काम करत होता. तो एक सामान्य नागरिक आणि गरीब कामगार होता. दीपूने प्रेषितांबद्दल अपमानास्पद टिप्पणी केल्याचा आरोप होता. परिणामी, कारखान्यातील मुस्लिम कामगार त्याला शिक्षा देण्याची मागणी करत होते. कारखान्यातील मॅनेजरने त्याला नोकरीचा राजीनामा देण्यास भाग पाडले. नंतर त्याने दिपूला कारखान्याबाहेर उभ्या असलेल्या उन्मादी अनुयायांच्या हाती स्वाधीन केले. त्यांनी दीपूला मारहाण केली, त्याला फाशी दिली आणि जाळून टाकले.' तस्लीमा नसरीन पुढे म्हणाल्या, 'पैंगरबर यांच्या अनुयायांनी एक घृणास्पद जिहादी तमाशा केला.

## दक्षिण आफ्रिकेतील गोळीबारात 10 जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियामध्ये बोंडी बीचवर बेछूट गोळीबार करण्याची घटना ताजी असतानाच आता दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथील बेकरसडल टाऊनशीपमध्ये बेछूट गोळीबार करण्याची घटना घडली आहे. या गोळीबारात 10 लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच इतर 10 लोक जखमी झाले आहेत. या महिन्यातील दक्षिण आफ्रिकेतील ही दुसरी मास शुटींगची घटना आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जोहान्सबर्ग येथून नैऋत्य दिशेला 40 किमी अंतरावर असलेल्या बेकरसडल टाऊनशीपमध्ये रविवारी सकाळी गोळीबार करण्यात आला.

# दीनांचा नाथ हरपला

## दीनानाथ वाघमारे यांचे निधन

**नागपूर :** ललित, वंचित, उपेक्षितांच्या धडपडीचा कार्यकर्ता म्हणून ओळख असलेले दीनानाथ वाघमारे यांचे आज सकाळी 9:30 वाजता महात्मा गांधी चौक, अयोध्या नगर नागपूर येथे राहत्या घरी निधन झाले. ते मागील दीड वर्षांपासून आजाराशी झुंजत होते. संघर्ष वाहिनी संस्था उभी करून



दीनानाथ वाघमारे यांनी सामाजिक उपेक्षितांचा सकारात्मक लढा उभा केला. नवीन कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली. विशेषतः भटक्या आणि विमुक्त समाजातील लोकांना, शिक्षण, अन्न, सामाजिक न्याय मिळाला पाहिजे यासाठी ते लढत राहिले. वंचित घटकांच्या वाड्या, वस्त्यांवर भेटी देऊन सत्याधारीत माहिती सरकारदरबारी सादर करून उपेक्षितांचे प्रश्न लक्षात आणून दिले. त्यांचे अंतीम संस्कार मोक्षधाम येथे झाले. अंत्ययात्रेला सर्व स्तरातील कार्यकर्ते, त्यांचे चाहते आणि कुटुंबातील लोक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# आता 125 दिवसांच्या कामाची हमी

# व्हीबी-जी रॅम जी कायद्या?

**नवी दिल्ली :** राष्ट्रपतींनी विकास भारत-रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) किंवा व्हीबी-जी रामदी विधेयक, 2025 ला मान्यता दिली आहे. या मंजुरीसह, हे विधेयक आता कायद्यात रूपांतरित झाले आहे. या कायद्याअंतर्गत, ग्रामीण कुटुंबांसाठी वैधानिक वेतन रोजगार हमी दर आर्थिक वर्षात किमान 125 दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. सरकार याला एक ऐतिहासिक पाऊल म्हणत आहे जे ग्रामीण जीवनासाठी एक मजबूत पाया प्रदान करेल. सरकारचे म्हणणे आहे की व्हीबी-जी रामदी कायद्याच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागात रोजगाराची कायदेशीर हमी मजबूत होईल.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की या विधेयकावर संसदेत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली. विरोधकांनी असा युक्तिवाद केला की सरकार जाणूनबुजून मनरेगाचे नाव बदलत आहे. मनरेगात महात्मा गांधींचे नाव देखील होते, म्हणूनच भाजपने ते नाव काढून टाकण्यासाठी हे विधेयक आणले. दरम्यान, सरकारने असा युक्तिवाद केला की मागील योजनेत 100 दिवसांचे काम मिळत असे.




तथापि, या कायद्यानुसार आता किमान 125 दिवसांचे काम देणे बंधनकारक आहे.

या चर्चेदरम्यान, काँग्रेस नेते प्रमोद तिवारी यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी सांगितले की जेव्हा जेव्हा काँग्रेस सत्तेत येईल तेव्हा ते त्याचे नाव पुन्हा बदलतील. या सर्व गदारोळात, विधेयकाला आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. तथापि, विरोधकांनी संसदेत या विधेयकाला जोरदार विरोध केला. शिवाय, विरोधकांनी संविधान भवनाबाहेर रात्रभर धरणेही दिले. या कायद्यानुसार, पात्र ग्रामीण कुटुंबांना दरवर्षी 125 दिवसांचे वेतन-आधारित काम देणे ही आता सरकारची जबाबदारी असेल. ग्रामीण मजूर, शेतकरी आणि भूमिहीन कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे आणि त्यांना आर्थिक सुरक्षा प्रदान करणे हे त्याचे थेट उद्दिष्ट आहे. सरकारचा दावा आहे की यामुळे गावांमधील गरिबी कमी होईल आणि लोकांना त्यांच्या स्वतःच्या क्षेत्रात काम मिळेल. सरकार म्हणते की नवीन कायद्याचा उद्देश केवळ रोजगार प्रदान करणे नाही तर ग्रामीण समाजाला समग्रपणे सक्षम करणे देखील आहे. व्हीबी-जी राम जी यांच्या अंतर्गत, समावेशक विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे, जेणेकरून योजनांचे फायदे समाजातील सर्वात खालच्या स्तरापर्यंत पोहोचतील. सरकारचा दावा आहे की हा कायदा महिला, असुरक्षित गट आणि गरजू

- प्रथम, योजनेत रोजगार दिवसांची संख्या 100 वरून 125 पर्यंत वाढवण्याचा दावा केला आहे. शिवाय, ग्रामीण भागात हाती घेतलेली सर्व कामे विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅकमध्ये समाविष्ट केली जातील.
- राज्य सरकारे पेरणी आणि कापणीचा कालावधी लक्षात घेऊन व्हीबी-जी राम जी अंतर्गत 60 दिवसांसाठी काम कधी थांबवायचे हे ठरवू शकत असल्याने, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात काम करण्यासाठी, विशेषतः पीक हंगामात, मजुरांची कमतरता भासणार नाही. यामुळे कामगारांना मनरेगा कामाव्यतिरिक्त इतर स्रोतांमधूनही मजुरी मिळू शकेल.

कुटुंबांना स्वावलंबी बनविण्यासाठी सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला कायमस्वरूपी चालना मिळेल. ग्रामीण भागात सुरू असलेल्या योजना अधिक प्रभावी परिणाम देण्यासाठी सरकार एकत्रित करू इच्छिते. रस्ते, जलसंधारण, सिंचन, गृहनिर्माण आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांना रोजगाराशी जोडून गावांचे रूपांतर करण्याची योजना आहे.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या!

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यावसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

“ आपले ध्येय साधण्याकरिता तुम्हाला त्या ध्येयावर लक्ष केन्द्रित करावे लागेल. ”
डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम



बहुजन सौरभ

## संपादकीय

# एपस्टीन प्रकरण : उघड झालेले चेहरे, न उघडलेली ढोंगी व्यवस्था

एपस्टीनसारखा वित्तीय दलाल राजकीय दलाल हा प्रकार नवीन नाही, इतिहासात अनेकदा पैसा, व्यापार आणि सत्तेचा मेळ लैंगिक शोषण, गुलामगिरी आणि मानवी तस्करीसारख्या गुन्ह्यांतूनच घडला आहे. म्हणूनच एपस्टीनकडे केवळ एका व्यक्तीचे प्रकरण म्हणून नाही, तर शतकानुशतके सुरू असलेल्या अशा वित्तीय-राजकीय संस्कृतीचा ताज्या काळातील नमुना म्हणून पाहायला हवे. वित्तीय शक्ती आणि लैंगिक शोषण एपस्टीन हा फाइनान्सिअर म्हणून अब्जाधीश ग्राहकांसाठी पैसा सांभाळत असे, आणि याच संपत्तीच्या बळावर त्याने अल्पवयीन मुलींचे सेक्स ट्रॅफिकिंग रॅकेट उभे केले, असा आरोप आणि दोषारोपांचा इतिहास आहे. अलीकडेच अमेरिकेतच दुसरा गुंतवणूक बँकर हाउई रुबिन याच्यावर महिलांना पैशाचे आमिष दाखवून, लक्झरी हॉटेल आणि अपार्टमेंटमध्ये सेक्स टॉर्चर करणाऱ्या तस्करी नेटवर्कचे नेतृत्व केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे, यातही वित्तीय प्रतिष्ठा हीच भरतीचे हुक आहे. इतिहासात ‘ट्रेड’ आणि शोषण ब्रिटिश साम्राज्याचे आर्थिक बळ उभारणाऱ्या ईस्ट इंडिया कंपनीसारख्या कंपन्या व्यापाराच्या नावाखाली गुलामगिरी, अफू व्यापार, भूमी जप्ती आणि करसंकलन यांतून प्रचंड नफा कमावत होत्या, वित्तीय गुंतवणूकदार, राजकारणी आणि व्यापारी यांचे हित सारे एकत्र गुंफलेले होते. 19 व्या शतकातील अफू व्यापाराने चीनला आर्थिक-सामाजिकदृष्ट्या उद्ध्वस्त करत असताना लंडनमधील व्यापारी व अमेरिकन व्यापारी वर्गाने रेल्वे, हॉटेल्स आणि औद्योगिक क्रांतीचे भांडवल या नफ्यातून उभारले, म्हणजेच ट्रेडिंग हा शब्द बाहेरून व्याज व्यापाराचा भास देत असला तरी प्रत्यक्षात तो मानवी शरीरांवर आणि व्यसनांवर उभा होता. बँका, शेल कंपन्या आणि मानवी तस्करी : आधुनिक मानवी तस्करीच्या अनेक प्रकरणांत पोलिसांना फॉलो द मनी करताना नऊ बँका, डझनभर शेल कंपन्या आणि असंख्य खात्यांची साखळी सापडते. सेक्स ट्रॅफिकिंग रॅकेट दरमहा लाखो रुपये डॉलर्स फिरवते आणि त्यातून मालमत्ता, जमीन, व्यवसाय उभे केले जातात. एपस्टीनसारख्या प्रकरणातही शेल कंपन्या, ऑफशोअर ट्रस्ट, गुंतवणूक फंड या माध्यमांतून पैसा पांढरा करण्याचा आणि राजकीय देणग्यांमार्फत प्रभाव विकत घेण्याचा पॅटर्न दिसतो, हेच वित्तीय-राजकीय इकोसिस्टम भारतीय कॉर्पोरेट राजकारणात वेगळ्या नावाने दिसते. व्याज व्यापार, हवाला, फ्रंट कंपन्या, राजकीय फंडिंग आणिरिअल इस्टेट-कॅसिनो-बार यांच्या गाठींतून हीच संस्कृती तुकड्या-तुकड्यांनी दिसून येते. जगभरातील राजकारण, उद्योगजगत आणि उच्चभ्रू वर्गाच्या काळ्याकभिन्न बाजूला उघड करणाऱ्या एपस्टीन प्रकरणाकडे भारतात ज्या प्रकारे पाहिले जात आहे, ते स्वतः भारतीय लोकशाहीतील दांभिकता, नैतिक दिवाळखोरी आणि माध्यम-राजकारण युतीचा आरसा बनले आहे. या प्रकरणातील फाइल्स, लिस्ट, फोटो आणि विमानाची प्रवासी यादी याभोवती फिरणाऱ्या अफवांनी जणू नैतिक चहाच्या टपऱ्यांवर नवा मसाला पुरवला, पण याच गोंगाटात खरी चर्चा लैंगिक शोषण, मानवी तस्करी आणि सत्तेच्या दुरुपयोगाची मुद्दाम गाडली जात आहे. ‘एपस्टीन’ बाहेर, ‘एपस्टीनवाद’ आत : एपस्टीनची व्यक्ती म्हणून जितकी चर्चा होते, तितकी चर्चा एपस्टीनवाद या प्रणालीबद्दल होत नाही, हेच सर्वांत मोठे अपयश आहे. काही श्रीमंत, प्रभावशाली पुरुष एकत्र येऊन अल्पवयीन मुलींना पैशाने, दबावाने, गाजावाजाने किंवा आमिषाने जाळ्यात ओढतात, त्यातून मनोरंजन नावाचा विकृत उद्योग उभा करतात आणि त्याला राजकीय संरक्षण दिले जाते, हा नमुना भारतात अनोळखी नाही. पण जेव्हा हा नमुना अमेरिकन अब्जाधीश, खासगी जेट आणि कॅरिबियन बेटांवर उघड होतो, तेव्हा भारतीय मध्यमवर्गाला अचानक नैतिक आक्रोश आठवतो, देशांतर्गत कास्टिंग काउच, बारबाला, देहव्यापार, बाललैंगिक अत्याचार यांच्या बाबतीत हा आक्रोश कुठे लपून बसलेला असतो, याची चौकशी कोणीच करत नाही. भारतीय माध्यमे या प्रकरणात चौथा स्तंभ म्हणून नव्हे तर टीआरपीचा दलाल म्हणून वागताहेत, हे कटू पण स्पष्ट सत्य आहे. एपस्टीन फाइल्समुळे सरकार कोसळणार का?, फक्त 24 तासांत भारतीय राजकारणात भूकंप?, फ्लॅटमध्ये, यॉटवर, बेटावर कोण कोण? अशा भडक शीर्षकांनी वाचकांच्या कुतूहलाला चाळवले जाते, पण तथ्यांचे कठोर परीक्षण, कायदेशीर संदर्भ, बळींची बाजू आणि प्रणालीगत प्रश्न यांना दुय्यम नव्हे तर तृतीय श्रेणीचा दर्जा दिला जातो. माध्यमांनी स्वतःला सत्यशोधक म्हणवून घेण्याचा हक्क तेव्हाच आहे, जेव्हा ते कोणत्याही पक्षाच्या किंवा उद्योगसमूहाच्या नावाचा उल्लेख करताना समान कसोटी वापरतात. एका विचारसरणीला न पटणारे नाव फाइलमध्ये दिसले तर त्यांचे नाकारणे म्हणजे दोष स्वीकार, आणि आपल्याला आवडणाऱ्या गटाचे नाव आले तर ही तर आंतरराष्ट्रीय साजिश - हा दुटप्पी मापदंड माध्यमांनी, आणि तितक्याच उत्साहाने प्रेक्षकांनी स्वीकारलेला आहे. ही मानसिक गुलामी लोकशाहीसाठी अधिक धोकादायक आहे, कारण ती नागरिकांना विचारक्षम व्यक्तीऐवजी फॉरवर्ड मशीन मध्ये बदलते. सोशल मीडियाः जनमत की जनउन्माद? एपस्टीन फाइल्सच्या नावाखाली सोशल मीडियावर चालणाऱ्या जनअदालत ही मुक्त अभिव्यक्ती नव्हे तर असभ्य सार्वजनिक लिंचिंगची नवी पद्धत आहे. कोणाचेही नाव, फोटो किंवा travel log एका कथित डॉक्युमेंटमध्ये दिसला की, तो नक्की गुन्हेगार असा ठपका लावण्याची वृत्ती न्यायालयीन तत्वांना सरळसरळ विरोध करते. हा विरोध फक्त कायदेशीर नाही, तर नैतिकही आहे कारण अशा गदारोळात खऱ्या बळींचा आवाज, त्यांची साक्ष, त्यांचे मानसिक आघात आणि त्यांना न्याय मिळवून देण्याचा धीर, या सगळ्यांचा पूर्णपणे गळा घोटला जातो. याहूनही अधिक भयानक म्हणजे, हीच सोशल मीडिया संस्कृती उद्या एखाद्या खोट्या किंवा बनावट फाइलचा उपयोग करून कोणत्याही निष्पाप व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकते. आज आपल्याला न आवडणाऱ्या नेत्यावर चाललेला ऑनलाइन हल्ला उद्या आपल्या मित्रावर किंवा आपल्यावर चालू शकतो, ही साधी समज अनेकांना अजूनही झालेली नाही. राजकारणाची सोयीस्कर नैतिकता : एपस्टीन प्रकरणात भारतीय राजकारण्यांची भूमिका ही आदर्श नसेल तर किमान प्रामाणिक तरी असावी, अशी अपेक्षा होती, परंतु प्रत्यक्षात जे दिसते, ते सोयीस्कर नैतिकतेचे गच्च भरलेले पिंप आहे. विरोधक फाइल्सचा उपयोग सत्ताधारी गटाला घेरण्यासाठी करतात, सत्ताधारी गट हे सगळे परकीय कट म्हणून झटकून टाकतात, मधल्या काळात कोणत्याही पक्षाने लैंगिक शोषणाबाबतची देशांतर्गत कायदेव्यवस्था, पोलीस आणि न्यायालयांची क्षमता, बळींच्या पुनर्वसनासाठीचा निधी, रॅकेटला जन्म देणाऱ्या आर्थिक, कायदेशीर आणि सांस्कृतिक रचनेला उघड करणे. तपास यंत्रणांवर नागरी पाळत ठेवणे आणि त्यांची निष्पक्षता सुनिश्चित करणे. बळींच्या पुनर्वसनासाठी, मानसिक आधारासाठी आणि सामाजिक स्वीकारासाठी स्वतंत्र व सक्षम व्यवस्था उभारणे. या तिन्ही आघाड्यांवर भारतीय राज्यसत्ता आणि समाज दोन्ही अपयशी ठरत आहेत. एकीकडे बेटावरील फोटो आणि प्रायव्हेट जेट लॉगवर लोक तासनतास वाद घालत असताना, दुसरीकडे आपल्या गावात, शहरातच घडणाऱ्या लैंगिक अत्याचारांविषयीची बातमी दोन इंचच्या कोपऱ्यात दाबून ठेवली जाते. हा अन्यायपूर्ण प्राधान्यक्रम बदलल्याशिवाय कोणतेही एपस्टीन फाइल्स आपल्याला नैतिक समाज बनवू शकत नाहीत. तो भारतीय समाजाच्या चेहऱ्यासमोरही तितकाच धारदार आरसा आहे. या आरशात आपल्याला दिसते स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दलचे आपले ढोंगी विचार, पैशासाठी आणि सत्तेसाठी काहीही चालते ही वृत्ती, माध्यमांची भूक, आणि राजकारणाचा नंगानाच. जर या प्रकरणातून खरोखर काही शिकायचे असेल, तर पहिले पाऊल म्हणजे अफवांकडे मोहित होण्यापेक्षा संस्थात्मक सुधारणा मागणे, नावांवर राजकीय धुळफेक होईल, पण एपस्टीनवाद म्हणजे सत्तेच्या छायेत चालणारे लैंगिक शोषण आणि मानवी तस्करी हे आपल्या समाजात तितक्याच निर्लज्जपणे सुरूच राहील. आणि मग आपण सगळेच, बळींसह, या सामूहिक मौनाचे सह-अपराधी ठरू. ■■

# हिजाब - नितीशकुमार चुकले

**15 डिसेंबर 2025 रोजी बिहार राज्यातील नवनियुक्त यूनानी, होमिओपॅथिक, आयुर्वेदिक ई. अशा जवळपास हजारावर आयुष डॉक्टरांना मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या हस्ते पटना महाविद्यालयात नियुक्तीपत्र देण्याचा सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केला होता. जेंव्हा डॉ. नुसरत परवीन नियुक्तीपत्र स्विकारत होत्या, तेंव्हा बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी त्यांच्या चेहऱ्यावरील हिजाब खाली ओढला. अचानक घडलेल्या या कृत्याने डॉ. महिला लज्जेसह अपमानित झाली आणि देशभर या घटनेला तोंड फुटले.**

घटनेचे व्हिडिओ चित्रण, बातम्या, सोशल मिडीयावरील कॉमेंट्स वेगाने फिरू लागल्या. यापूर्वीसुद्धा कर्नाटकमधे एका महाविद्यालयातील विद्यार्थीनीने हिजाब घातला म्हणून धार्मिक वाद सुरू केला होता आणि देशभर हिंदू मुस्लीम अशा वादाला सुरुवात केली होती. मला असे वाटते की, जी महिला हिजाब घालते, ती तिच्या ईच्छेने घालते. तिच्या स्वखुषीने घालते. तिच्या धर्मांखातर घालते. लज्जा, शिल आणि प्रतिष्ठेसह धर्म, संस्कृती, परंपरा, इज्जत, मानसन्मान टिकवून ठेवण्यासाठी घालते. तिला मिळालेल्या कौटुंबिक, सामाजिक स्वातंत्र्यामुळे ती हिजाब घालते. त्यातून ती काही चुकीचे करीत नाही. हिजाब घालण्याचा सर्वश्री आधिकार त्या महिलेचा आहे. तिने अंगभर कपडे परिधान करायचे की तोकडे? हा तिच्या मताचा, विचाराचा, आवडीचा, स्वातंत्र्याचा आणि तिच्या आधिकारात घेतलेल्या निर्णयाचा भाग आहे. असमानतेवर आधारित पुरूषप्रधान संस्कृती इथे बळजबरीने तिच्यावर लादल्या जातेय, असा गळा काढण्यात काही एक अर्थ नाही. हिजाब आमची कौटुंबिक, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे, असे म्हणत जर महिला हिजाब घालत असतील, तर ही परंपरा मानायची की नाही? हे त्यांनाच ठरवू द्यावे. याचे उत्तर त्यांनाच देऊ द्यावे. त्यात इतर धर्मीयांनी चांगले वाईट म्हणत हस्तक्षेप करता कामा नये. काही राज्यातून हिंदू महिलांच्या घूंघट प्रथा आजही सुरू आहेत. त्याविरुद्ध मुस्लिम बोलतात काय? तर



नाही. मग मुस्लीम महिला हिजाब घालतात त्याबाबत हिंदूंनी का बोलावे? अशी अवमानजनक वर्तणूक वारंवार का द्यावी? यावर विचार झाला पाहीजे. खरे तर धर्मांच्या मूठभर ठेकेदारांनी आधी हे निट समजून घेतले पाहीजे की, मुस्लिम महिलांनी हिजाब घातला म्हणून धर्म बुडतोय किंवा आमचे मन दुखावतेय असे म्हणण्याचे काहीच कारण नाही. असे चुकीचे वाटून घेऊन देशाच्या एकतेचा, अखंडतेचा, शांततेचा, सामाजिक सौहार्दाचा आणि सर्वधर्मसमभावाचा बळी देता कामा नये. नितीशकुमार तर सर्वार्थाने चुकलेच. ते मुख्यमंत्री म्हणूनही चुकले आणि माणूस म्हणूनही चुकले. त्यांनी मानवतेचा अपमान केला. त्यांनी एका स्त्रीचा अनादर, अवमान केला. त्यांनी तिच्या धर्माचा अपमान केला. त्यांनी महिला डॉक्टर म्हणून स्त्री स्वातंत्र्याचाही अपमान केला. माजी केंद्रीय मंत्री राहिलेले आणि बिहारचे मुख्यमंत्री असलेल्या व्यक्तीला अशी टवाळखोर वर्तणूक शोभत नाही. त्यांनी असे जाणीवपूर्वक केले, याला त्यांच्याच विषम विचार, कृती आणि वृत्तीने पुष्टी मिळते. नितीशकुमार यांच्या या कृत्यामागे तमाम मुस्लिम बांधवांना अपमानित करण्याचा हेतू दिसतोय. या कृत्याने तमाम मुस्लिम स्त्रियांचा अनादर करण्याचा हेतू दिसतोय. नितीशकुमार यांनी डॉक्टर महिलेस नियुक्तीपत्रच द्यायला हवे होते. तिचा हिजाब ओढण्याचे काही एक कारण नव्हते. नियुक्तीपत्र देण्याच्या नावाखाली जाहीर कार्यक्रमात डॉक्टर स्त्रीला धर्म पेहरावावरून अपमानित करणे, तिला दुखावणे ही अतिशय अमानवीय आणि अशोभनीय कृती झाली. अशा कृत्याद्वारे नितीशकुमारसह भाजप आणि संघाचा इतर धर्मियांविरोधी रोष किती टोकाचा आहे, ते दिसतेय. इतर धर्मियांच्या रहन सहन, खान-पानास जाणीवपूर्वक विरोध करणे हाच या कटाचा भाग दिसतोय. असे वाद उभा करणारी मानसिकता आर.एस.एस, भाजपाची आहे. या कृत्याने नितीशकुमारची वैचारिक पातळी देशाला माहीत झाली आहे. हे काही शहाणपण नव्हे. ही काही नैतिकता नव्हे. ही कृती म्हणजे विविधतेने नटलेल्या परंपरांना छेद आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद 25 तमाम भारतीयांना आपापला धर्म पालन करण्याचे स्वातंत्र्य देते. मग नितीशकुमारची ही तालीबानी वृत्ती कशासाठी? कायद्याच्या नजरेत महिलेच्या संमतीशिवाय स्पर्श, हा तिच्या सन्मानाला धक्का पोहोचवतो, तिच्यात लज्जेसह अपमानाची भावना निर्माण करतो, तो विनयभंग ठरतो. मग नितीशकुमार विरोधात गुन्हा दाखल का होऊ नये? जेलची हवा का दाखवू नये? सदर डॉ. महिला नियुक्तीपत्र स्विकारण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रमात आली होती. तिचा सन्मान करणे हेच मुख्यमंत्र्याचे संविधानिक, नैतिक आणि मानवीय कर्तव्य होते. परंतू त्यांची अशी वर्तणूक ही निंदनीय आहे. मुस्लिम हिरवे करतात म्हणून हिंदूंनी भगवे करावे, ही धर्माधर्मात वैरभाव निर्माण करणारी मानसिकता आहे. यात सर्वधर्मसमभावाची बीजे नाहीत. लक्षात घ्या, अशा वर्तणूकीत देश एकसंध ठेवण्याचा भाव नाही. तर अशा वर्तणूकीवरून धर्मद्वेष, तिरस्कार, स्त्री अनादर आणि अपमान भरलेला आहे. फुटीरतावाद टिच्चून भरलेला आहे. यात परधर्म द्वेष आहे, हटवादीपणा आहे. एकाच अंधश्रद्ध धर्मांध धर्माची री ओढण्याचा भाग आहे आणि अशी धर्मांध तेढ द्वेष



अॅड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

देशाच्या ऐक्यासाठी घातक आहे, मारक आहे. अशा वर्तनातून देश एकसंध उभा राहणार नाही. हिजाब मुद्द्यांवरून वाद उकरून काढून तो पेटता ठेवायचा, हा प्रकार देशाच्या एकात्मतेला नख लावणारा आहे. नितीशकुमार, तुमच्या बिहार राज्यातील वाढती गरीबी, महागाई, भूखमरी, कुपोषण, दारिद्र्य, बेरोजगारी, हतबलता, असहाय्यतेने लोक त्रस्त आहेत. यावर कोणी बोलू नये, राज्यात या विषयावर चर्चा होऊ नयेत, देशाचे लक्ष या मुद्द्यांवरून भरकटवून, त्यांच्यात धार्मिक उष्णता वाढवून, धर्मद्वेषाच्या अग्नीकुंडातील आगडोंब धगधगता ठेवायचा, हे त्यामागचे आर. एस. एस. भाजपचे व त्यांच्या संघटना झुंडीचे षडयंत्र आहे. परंतू लक्षात घ्या, तुमचे असे वागणे म्हणजे देशात धर्मांध द्वेष वाढीस लावून देशाचे प्रचंड मोठे नुकसान करणे होय. म्हणून नितीशकुमारची वर्तणूक निषेधार्ह आहे. स्त्रीयांचा अनादर आणि अवमान करणारे, धार्मिक तेढ निर्माण करणारे धर्मांध मनसुबे भारतीयांनी मिळून हानून पाडले पाहीजेत. संविधानासह धर्म, संस्कृती, परंपरा, स्वातंत्र्य, न्याय, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, बंधुभाव ई. सर्वच बाबींचा देशात दम घूटत आहे. देशात कायदा आणि सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडाल्या आहेत. जिकडे बघा तिकडे अराजक मने अशी स्थिती निर्माण करण्यावर राज्यकर्त्यांचा भर आहे. या पार्श्वभूमीवर देशातील एकता, अखंडता, बंधुभाव, सौहार्द, शांतता आबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी देशहितार्थ प्रयत्न केले पाहिजेत आणि येथून पुढे अशी धर्मद्वेषी भाषा कृतीला रोख लावण्याचा निर्धार केला पाहीजे. देशविघातक मुद्द्यांवरून देशाचे लक्ष विचलित होऊ देणार नाहीत, देशाला आपल्याच हातून गालबोट लागू देणार नाहीत, अशी शपथ भारतीय नागरिक म्हणून घेतली पाहीजे. ■■

# संविधानातून ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द हटविल्यास काय होईल?

**भीम सिंग (BJP सांसद) 2025 द्वारे बिल सादर केल्यावर कायदेशीर स्थिती कायदेशीर वास्तव ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ शब्द हटवण्याचे बिल संविधान सुधारणा बिल आहे. संसद पास करूनही, सुप्रीम कोर्ट ते रद्द करू शकते, कारण ‘Secularism = Basic Structure". "Basic Structure cannot be amended’. त्यामुळे 2025 मध्ये प्रस्तावित बिलाचे भविष्य खूपच कमकुवत आहे. काही राजकीय पक्ष व सामाजिक गटांची भूमिका काही राजकीय गट, जसे की Communist Party of India (Marxist) (CPI-M), यांचे म्हणणे आहे की, हा प्रयत्न फक्त भाषा बदलण्याचा नाही, तर संविधानाच्या मूलभूत ओळखीमध्ये बदल करण्याचा आहे.**

त्यांचा तर्क आहे की ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ हे शब्द काढणे म्हणजे भारताच्या ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ ओळखीवर थेट आघात आहे. हा फक्त भाषेतील बदल नाही, तर इतिहास आणि संविधानाची ओळख बदलण्याचा प्रयत्न आहे. राजकीय नेतृत्व आणि पक्षांची प्रतिक्रिया मलिकार्जुन खडगे (काँग्रेस) यांनी स्पष्ट पणे म्हटले आहे, की जर हे शब्द हटवणे इतके सोपे असते, तर भाजपाने हे पाऊल आधीच उचलले असते. त्यांनी सांगितले की संविधानाच्या प्रस्तावनेतून हे शब्द हटवण्याची चूक कोणत्याही परिस्थितीत मान्य करू नये. सार्वजनिक चर्चा आणि मीडिया विश्लेषण एका मीडिया विश्लेषणानुसार, ‘भारत आधीच धार्मिक स्वातंत्र्य, समानता, सामाजिक न्याय यांसारखे अधिकार देतो’, त्यामुळे प्रस्तावनेतून ‘सेक्युलर आणि सोशलिस्ट’ हटवण्याची मागणी ही ‘कल्पित समस्या’ आहे. कारण संविधानाची मूलभूत रचना (मूलभूत हक्क + निर्देशात्मक तत्त्वे) आधीपासूनच या तत्त्वांना लागू करते. वरील याचिकाकर्त्यांना काही अभ्यासकांनी उत्तर दिले आहे. बालचंदा विधानसभा क्षेत्रातील जी एच एडीसी चे माजी सदस्य सोफियोर रहमान यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी संविधानाच्या प्रस्तावनेतील ‘धर्मनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ हे शब्द हटवण्याच्या केलेल्या आवाहनाची तीव्र निंदा केली आहे. त्यांनी हे शब्द माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात आणीबाणीच्या काळात समाविष्ट केलेले पाश्चिमात्य विचार असल्याचे म्हटले. त्या संदर्भात यावर आक्षेप घेत पूर्व एमडीसी रहमान यांनी हे वक्तव्य ‘तथ्यात्मकदृष्ट्या भ्रामक, घटनात्मक दृष्ट्या असंवैधानिक आणि राजकीयदृष्ट्या भडकावू ‘असल्याचे म्हटले. या संदर्भात, वन विकास महामंडळाचे माजी उपाध्यक्ष रहमान पुढे म्हणाले’ हे खरे आहे की धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे शब्द 42 व्या घटनादुरुस्ती (1976) मार्फत औपचारिकपणे प्रस्तावनेत समाविष्ट करण्यात आले. परंतु त्यांची तत्त्वे अनुच्छेद 14 (कायद्यापुढील समानता), अनुच्छेद 25-28 (धार्मिक स्वातंत्र्य), आणि राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये (सामाजिक आणि आर्थिक न्याय) आधीपासूनच अंतर्भूत होती.’त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विशेषतः एस. आर. बोम्मई विरुद्ध भारत संघ (1994) या ऐतिहासिक निर्णयाचा उल्लेख केला, ज्यात म्हटले आहे. की धर्मनिरपेक्षता हा संविधानाच्या मूलभूत रचनेचा भाग आहे आणि त्यामुळे संसदेला तो शब्द काढून टाकण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार नाही. रहमान यांनी मुख्यमंत्र्यांच्या विधानातील चुकीचे मुद्देही दाखवून दिले आणि म्हणाले, ‘भारतीय संदर्भातील धर्मनिरपेक्षता ही कोणतीही पाश्चिमात्य आयात नाही; ती अशोक, अकबर ते गांधीपर्यंत सहिष्णुता, बहुलवाद आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या भारताच्या शतकानुशतके जोपासलेल्या मूल्यांत रुजलेली आहे.’

पूर्व एमडीसी यांनी हेही स्पष्ट केले की सरमा यांचे ‘मी कट्टर हिंदू आहे म्हणून धर्मनिरपेक्ष असू शकत नाही’ हे विधान भारतीय धर्मनिरपेक्षतेचे चुकीचे आकलन दर्शवते. ते पुढे म्हणाले, ‘कोणताही व्यक्ती आपल्या धर्माचे पालन करत असतानाही धर्मनिरपेक्ष राज्याचा समर्थक असू शकतो. भारतीय धर्मनिरपेक्षतेनुसार राज्याचा स्वतःचा धर्म नसतो आणि ते सर्व नागरिकांशी त्यांच्या श्रद्धेची पर्वा न करता समान वागणूक देते.’ रहमान म्हणाले, ‘घटनात्मक व्यवस्थेनुसार भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य आहे आणि प्रस्तावनेतून हे शब्द हटवण्याची कोणतीही मागणी केवळ कायदेशीरदृष्ट्या अस्वीकार्य नाही, तर नैतिकदृष्ट्याही गैरजबाबदार आहे.’ त्यांनी ठामपणे सांगितले की संविधानाची शपथ घेतलेल्या राजकारण्यांनी त्याच्या मूल्यांचा आदर केला पाहिजे आणि वैचारिक सोयीसाठी त्यांना प्रश्नांकित करण्याचा किंवा कमजोर करण्याचा प्रयत्न करू नये. ते पुढे म्हणाले, ‘भारताची ताकद विविधतेतील एकतेत आहे. धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद हे परकीय शब्द नाहीत; ते भारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत, जे समावेशकता, समानता आणि न्यायाचे रक्षण करतात.’ रहमान यांनी घटनात्मक पदाधिकाऱ्यांना आणि भारतातील



जनतेलाही विभाजनकारी कथानक नाकारण्याचे आणि गणराज्याच्या मूलभूत मूल्यांचे संरक्षण करण्याचे आवाहन केले. राज्यसभा ‘संविधानातून ‘समाजवाद’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द हटवण्याची योजना नाही’ राज्यसभेत सरकारने सांगितले. 25 जुलै 2025 च्या बातमीनुसार केंद्र सरकारने राज्यसभेत सांगितले की, सध्या संविधानाच्या प्रस्तावनेतून ‘समाजवाद’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द हटवण्याची किंवा त्यावर सुधारणा करण्याची कोणतीही योजना नाही. तरीसुद्धा काही मंडळी या विरोधात का सतत धडपडत असतील? सरकारने असेही सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने या सुधारणा वैध ठरवल्या आहेत. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी राज्यसभेत सांगितले की, सध्या या शब्दांना हटवण्याबाबत सरकारकडे कोणतीही योजना नाही, किंवा त्या संदर्भात औपचारिक प्रक्रिया सुरू केलेली नाही. सरकारने राज्यसभेत काय सांगितले राज्यसभेत रामजीलाल सुमन यांनी या विषयावर प्रश्न विचारला. केंद्रीय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी लिखित उत्तरात सांगितले ‘सरकाराचा अधिकृत दृष्टिकोन असा आहे की संविधानाच्या प्रस्तावनेतील ‘समाजवाद’ आणि ‘धर्मनिरपेक्ष’ शब्दांविषयी पुनर्विचार करणे किंवा हटवण्याची सध्या कोणतीही योजना नाही. ‘प्रस्तावनेत सुधारणा करण्यासाठी सविस्तर विचार-विमर्श आणि व्यापक सहमतीची आवश्यकता आहे, पण सध्या कोणतीही औपचारिक प्रक्रिया सुरू केलेली नाही. सुप्रीम कोर्टनेही दिला वैधतेचा पाठिंबा केंद्रीय मंत्री म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने 1976 मधील 42वी संविधान सुधारणा वैध असल्याची पुष्टी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ‘डॉ. बलराम सिंह व इतर बनाम भारत संघ व इतर’ प्रकरणात या सुधारणा आव्हान करणाऱ्या याचिका खारिज केल्या. न्यायालयाने स्पष्ट केले की भारतात समाजवाद म्हणजे कल्याणकारी राज्याचे प्रतीक आहे आणि हे खाजगी क्षेत्राच्या विकासात अडथळा निर्माण करत नाही. तसेच, धर्मनिरपेक्षता संविधानाच्या मूलभूत ढाच्याचा अविभाज्य भाग आहे. 2021 ला सुद्धा प्रस्तावनेतून ‘समाजवादी’ शब्द हटवण्यासाठी राज्यसभेत प्रायव्हेट मेंबर बिल सादर केले होते. विरोधामुळे चर्चा थांबली. संविधानाच्या प्रस्तावनेतून ‘पंथनिरपेक्ष’ आणि ‘समाजवादी’ शब्द हटवण्याची मागणी वारंवार उभी राहते. बीजेपीचे राज्यसभेचे सांसद केजे अल्फोंस यांनी यासंदर्भात प्रायव्हेट मेंबर बिल सादर केले. बिल सादर करताच विरोधकांनी आपत्ती नोंदवली आणि उपसभापती हरिवंश यांनी अल्फोंसला विधेयकावर सुरुवातीचा खुलासा करण्यास मनाई केली. नंतर उपसभापतींनी हे संविधान सुधारणा बिल रिझर्व केले. या संदर्भात तेजस्वी यादव म्हणाले, ‘केंद्रातील भाजप सरकार संविधान बदलण्याचा एक चोरीचा प्रयत्न करत होते, जो काल संसदेत पकडला गेला. त्यांनी संविधानाची प्रस्तावना जिला त्याची आत्मा म्हटले जाते यातून ‘समाजवादी’ हा शब्द काढून टाकणारे संविधान दुरुस्ती विधेयक सादर केले होते. पण आमच्या जागरूक आणि सतर्क सदस्यांनी कठोर विरोध करून हे विधेयक मागे घ्यायला भाग पाडले.

उपसभापतींनी नियमांचा संदर्भ देताना सांगितले की या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळालेली नसल्याने यावर सदनात चर्चा करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. उपसभापतींच्या या निर्णयानंतर बीजेपीच्या खासदारांनी नियमांचे पालन करत आपापल्या जागेवर बसून घेतले. त्यानंतर उपसभापतींनी हे विधेयक राखून ठेवले. आता आरजेडी याच्या बहाण्याने सत्ताधारी बीजेपीवर जोरदार हल्ला चढवत आहे. पक्षप्रमुख लालू प्रसाद यादव आणि त्यांचे पुत्र



पुरुषोत्तम संबोधी
मो.9422803760

तेजस्वी यादव यांनी ट्विटद्वारे संविधानाच्या आत्म्यात चुपचाप छेडछाड केल्याचा आरोप केला आहे. जर संसदेने बिल पास केले तर काय होईल? जरी राज्यसभा आणि लोकसभा दोन्हींनी 2/3 बहुमताने बिल पास जरी केले, तरी त्यानंतर पुढील पाऊल उचलले जाईल राष्ट्रपतींची मान्यता (President's Assent). ही औपचारिक प्रक्रिया आहे, पण संवैधानिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. ताबडतोब सुप्रीम कोर्टात आव्हान (Judicial Review). 100 टक्के या सुधारणा कोर्टात आव्हानास समोर जाईल. यात सामील असतील वकील, सक्रिय नागरी समाज, विरोधी पक्ष, नागरी गट, संवैधानिक तज्ञ. सुप्रीम कोर्ट ते थांबवू शकते. कोर्ट stay order (अस्थायी रोक) देऊ शकते आणि सुनावणी सुरु होईल. सुप्रीम कोर्ट याला कसे पाहील? (कायदेशीर विश्लेषण) सुप्रीम कोर्टाचे मागील निर्णय (Bommai 1994, Minerva Mills 1980, SC Order 2024) स्पष्ट करतात ‘Secularism हा संविधानाच्या मूलभूत रचनेचा भाग आहे.’ मूलभूत रचना (Basic Structure) बदलली जाऊ शकत नाही. त्यामुळे ‘सेक्युलर’ शब्द हटवणे असंवैधानिक. बिल पास झाल्यावरही सुप्रीम कोर्ट बहुधा हे बदल रद्द करेल. कारण संविधानाची प्रस्तावना फक्त ‘शब्दांची यादी’ नाही. ही भारताच्या सांविधानिक ओळखीचा भाग आहे आणि ही ओळख बदलणे संसदेचे अधिकार नाही. कायदेशीर निष्कर्ष हटवणे जवळजवळ अशक्य आहे (संसद जरी हवे तितके प्रयत्न करते, कोर्ट थांबवेल) जर सुप्रीम कोर्टने रद्द केले तर काय होईल? बिल शून्य (null & void) घोषित होईल. संविधान त्याच रूपात राहील (Secular + Socialist यथावत). प्रशासनिक किंवा सामाजिक बदल होणार नाहीत. संसदेचा निर्णय उलटला जाईल. राजकीय परिणाम मोठ्या प्रमाणावर दिसतील (बहस, विरोध, समर्थन). जर शब्द काढले गेले तर देशावर काय परिणाम होईल? (काल्पनिक पण संभाव्य विश्लेषण). भारताची संवैधानिक ओळख बदलेल. भारत औपचारिकरित्या ‘सेक्युलर’ राष्ट्र म्हणून ओळखला जाणार नाही (जरी इतर कलमांमध्ये सेक्युलर तत्त्व राहील). अल्पसंख्यक समुदायांमध्ये व्यापक चिंता निर्माण होईल. विशेषतः मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन इत्यादी. जागतिक प्रतिमा प्रभावित होईल. आंतरराष्ट्रीय मंचावर भारताच्या ‘धर्मनिरपेक्ष लोकशाही’ ओळखीवर परिणाम होईल. संविधानाच्या इतर व्याख्यांवर परिणाम होईल. मूलभूत हक्क, समानता, धार्मिक स्वातंत्र्य यांचे अर्थ बदलतील. इतर देशांमध्ये यासारखे उदाहरण नेपाळ 2006 पर्यंत हिंदू राष्ट्र होते. नंतर सेक्युलर झाले. संविधानाची ओळख बदलली, मोठा वाद झाला. श्रीलंका बौद्ध ‘supremacy clause’धार्मिक तणाव वाढला. टकी अत्तातुर्कची सेक्युलर ओळख नंतर कमी केली. लोकशाही रचना प्रभावित झाली. इझराइल ‘Jewish State’ शब्दामुळे काही समुदायांमध्ये कायदेशीर असमानतेची चर्चा. भारतात काय सर्वात संभाव्य आहे? कायदेशीर दृष्टिकोनातून 100टक्के निश्चित संसद हे बिल पास करू शकते (जर बहुमत असेल). पण सुप्रीम कोर्ट त्याची अंमलबजावणी होऊ देणार नाही. संविधानाची ओळख बदलेल नाही. ‘सेक्युलर’ आणि ‘सोशलिस्ट’ शब्द कायम राहतील. भारताचे संविधान जगातील सर्वात मजबूत ‘बेसिक स्ट्रक्चर डॉक्ट्रिन’ ठेऊन दिलेले आहे आणि याचमुळे बदल रोखला जाईल. लोकशाहीच्या नावावर आणि बहुमताच्या आधारे या देशात काहीही घडू शकते, अशी परिस्थिती आहे. त्यालाच बहुताच्या आधारे निर्माण झालेली हुकूमशाही म्हणता येऊ शकते. संसदेने मंजूर केलेले बील जरी सुप्रीम कोर्टाने रद्द केले, तरी तो निर्णय बदलविण्याची अंतिम शक्ती संसदेजवळ असते. त्या निर्णयाविरोधात पुन्हा कायदा तयार करू शकतात. नवीन कायदे निर्माण होतील, परंतु समता, मानवता मातीत गाडली जाईल, विषमतेचे सांगाडे शिल्लक राहतील. ■■



बहुजन मानस



नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )
9970873560

# संघ भाजपची सत्ता आणि ब्राह्मणी वर्ण वर्चस्वाकडे वाटचाल

**फॅसिस्ट संघटना वा त्या विचारांना मानणारे राजकीय पक्ष यांची भूमिका ही आणि राष्ट्रवाद सांगणारी असते. त्यात जात आणि वंशवाद यांना महत्त्व दिल्या जाते. त्याला ते राष्ट्र म्हणतात. उदा. रा. स्व. संघ ही फॅसिस्ट संघटना आहे ही बाब आता सर्व मान्य आहे. संघाचे हिंदू राष्ट्र हे फॅसिस्ट विचारांवर आधारित आहे. संघ मिलिटंट सैनिक संघटन आहे आणि तो सतत सामाजिक उतरंड कायम राहावी म्हणून आक्रमक असतो. त्याचप्रमाणे तो ज्या लोकांना किंवा धर्मांना विरोध करतो त्या विरुद्ध ही आक्रमक असते. उदाहरणार्थ संघ हा नेहमी सर्वाधिक मुस्लिमांविरुद्ध आक्रमक भूमिका घेताना दिसतो.**

मुस्लिम हे हिंदू राष्ट्राचे शत्रू आहेत अशा प्रकारची भूमिका हेडगेवारपासून गोळवलकर आणि आज मोहन भागवतपर्यंत घेतलेली आहे किंवा घेत आहेत. दुसरे म्हणजे ते इथल्या लोकांना देखील वर्ण व जातीय विषमतेत विभागून ठेवणे आणि तशा प्रकारची वागणूक किंवा व्यवहार समाजामध्ये राहील त्यासाठी सुद्धा आक्रमक भूमिका घेतो आणि या उलट लोकशाहीची भूमिका आहे. लोकशाही हे लोकांसाठी लोकांद्वारे निर्माण होणारी राजकीय व्यवस्था असते. परंतु संघ फॅसिस्ट नाझी विचाराचा आहे. आणि ही बाब संघाचे वैचारिक मार्गदर्शक मा. स. गोळवलकरांच्या लिखाणातून स्पष्ट होते आणि ते विचार त्यांनी लिहिलेल्या ‘वै ऑर अवर नेशनहूड डिफाइन्ड व बंच ऑफ थाट्स’ या त्यांनी लिहिलेल्या पुस्तकातून दिसून येते. त्यांनी कधीही लोकशाहीचा पुरस्कार केला नाही. त्यांनी चातुवर्ण्याचा पुरस्कार केला आणि त्यालाच त्यांनी हिंदू राष्ट्राचे रूप म्हटले आहे.

**संघाचे सत्ता काबीज करण्याचे प्रयत्न :-** ‘मनुचा मासा’ ‘रा. स्व. संघ’ या नावाचे पुस्तक अमरावती येथील प्रा. कु. ल. महाले यांनी 1984 मध्ये लिहिले आहे. त्यात त्यांनी संघाने 1947 साली दिल्लीची सत्ता काबीज करण्यासाठी आखणी केल्याचे लिहिले आहे. अर्थात, संघ गैर राजकीय मार्गाने सत्ता काबीज करण्याचे प्रयत्न करत होता. म्हणजे त्याला लोकशाही मार्ग महत्वाचा नाही. सत्ता काबीज करण्यासाठी तो काहीही करु शकतो. हे पुस्तक मुंबईच्या कम्युनिस्ट पक्षाशी संबंधित लोकवांग्मय प्रकाशनाने प्रसिद्ध केले होते. धीरेंद्र या दिल्लीतील प्रसिद्ध पत्रकार, लेखकाने संघांवर अनेक पुस्तके लिहिली. त्यातील इंग्रजी भाषेतील ‘गोळवलकर दी मीथ बिहाइंड दी मॅन, दी मॅन बिहाइंड दी मशीन’ या पुस्तकात ही बाब आहे आणि म्हणून आज जी सत्ता या देशावर आहे त्यांना आपण मोदीची सत्ता म्हणतो किंवा मोदीच्या नेतृत्वाखाली देशाचे राजकारण चालते असे म्हणतो. ते मोदी संघाचे प्रॉडक्ट आहेत. संघातून निर्माण झालेले व्यक्तिमत्त्व आहे आणि संघ जर फॅसिस्ट असेल तर मोदी शहा फॅसिस्ट सत्ताधारी ठरतात. जी सत्ता लोकांच्या इच्छेनुसार चालते, लोकांच्या भल्याचा विचार करते, लोकांचा सत्तेवर दबाव असतो ती लोकशाही असते. परंतु आज सत्तेवर दडपण संघाचे आहे आणि या दडपणाखाली लोकांच्या विचारांना, लोकांच्या गरजांना महत्त्व देण्यात येत नाही. जातीय उच्च नीचता किंवा चातुवर्ण्य हे लोकशाहीमध्ये बसत नाही. कारण जिथे समाजात बंधुता नाही, समता नाही, जिथे लोकांच्या इच्छेला महत्त्व नाही, लोकांच्या गरजांना महत्व नाही लोकांच्या गरजा आम्ही म्हणून तशा प्रकारे सोडवू म्हणजे एक प्रकारची हुकूमशाही अशा पद्धतीची ही नीती संघाची आणि भाजपची आहे. त्याप्रमाणे आज आपल्या देशाची सत्ता चालू आहे. म्हणजे इथे लोकशाही आहे म्हणणे भ्रम आहे.

**लोक भावना आणि सत्ता :-** स्वातंत्र्य मिळाल्यापासून लोकांच्या मनामध्ये जी भावना आहे ती त्यांच्या भल्याची आहे, शोषण विरहित आर्थिक रचनेची आहे, सामाजिक समतेची आहे, सामाजिक न्यायाची आहे. हे सर्व आजच्या संविधानामध्ये आहे. परंतु प्रत्यक्षात अजूनही ती स्थिती आलेली नाही. अजूनही त्यांच्या आकांक्षाची पूर्ती झालेली नाही. या उलट सामाजिक न्यायाच्या विरोधामध्ये, समतेच्या विरोधामध्ये आणि बंधुभावाच्या विरोधामध्ये वातावरण निर्माण केले जात आहे. धार्मिक उन्माद वाढत आहे आणि काही धर्मियांना शत्रू ठरवले जात आहे. दुय्यम नागरिक करण्याकडे वाटचाल आहे. ज्यांना सामाजिक रचनेत निम्न स्थान आहे ते कायम कसे राहील यासाठी ही सत्ता कार्यरत आहे. लोकांसाठी जिथे शासन नाही एका पक्षासाठी आहे आणि तो पक्ष एका जातीचा आहे एका जातीच्या भल्यासाठी, त्या जातीच्या वर्चस्वासाठी निर्माण झालेला पक्ष आहे त्याची सत्ता ही लोकसत्ता



म्हणता येत नाही. ती लोकशाही म्हणता येत नाही आणि म्हणून या देशांमध्ये आज जे चालू आहे ते फॅसिस्ट राजकारण नी राजनीती आहे आणि म्हणून आज देशातील जनता ही विषमतेत उच्चनीचतेत भरडल्या जात आहे आणि म्हणून खरी लोकशाही निर्माण करण्याची गरज आहे. फॅसीझमला लोकशाही म्हणा हा जो प्रकार लादण्यात येतो आहे. त्याचा विरोध करण्याची गरज आहे आणि नसण्याचे मूळ या देशांमध्ये जात व्यवस्था आहे. के. एम. पणिक्कर नावाच्या विचारवंतांनी आणि एकवेळ भारतीय शासनात मोठ्या पदावर असलेल्या अधिकारी यांनी 1936 साली ‘कास्ट अॅंड डेमॉक्रसी’ नावाचे पुस्तक लिहिलेले आहे आणि त्याच्यामध्ये म्हटले आहे की जोपर्यंत जात व्यवस्था आहे, तोपर्यंत या देशांमध्ये लोकशाही अवतरू शकत नाही, लोकशाही निर्माण होऊ शकत नाही. आपण लोक जर निवडणुका होतात. म्हणून लोकशाही असे म्हणत असू तर आपण एक प्रकारचा भ्रम पाळत आहोत. स्वतःलाच भ्रमात ठेवत आहोत. एक जातीय सत्तेला लोकशाही म्हणत आहोत. ही लोकशाही नसून हुकूमशाही आहे हे समजून घेण्याची गरज आहे. या हुकूमशाहीला फसून बहुजनातले जे लोक त्या पक्षात जातात. म्हणजे मनुवादी फॅसिस्ट सत्तेला मदत करतात. डॉ. आंबेडकरांनी जे संविधान साकारले त्याला विरोध करतात असे म्हणता येईल.

**मनुस्मृती संविधान :-** मनुस्मृती ज्या संघटनेचे संविधान आहे आणि आजच्या संविधानाला ज्या कारणावरून त्या संघटनेचा विरोध होता की या संविधानामध्ये मनुस्मृती मधले काही नाही आणि म्हणून हे संविधान आम्हाला मान्य नाही. त्या विचारांचा राजकीय पक्ष जर सत्तेत असेल तर त्या पक्षाला आजचे संविधान मान्य असू शकते का? कारण आरएसएसची भूमिका आहे तीच भूमिका भाजपची आहे, तीच भूमिका मोदी किंवा शहांची आहे आणि म्हणून आजच्या सत्तेला लोकशाही म्हणणे आभास आहे. कारण जी विचारसरणी समतेच्या विरोधी आहे, बंधुतेच्या विरोधी आहे, जात वर्णव्यवस्थावादी आहे ती संघटना किंवा तो पक्ष लोकशाहीवादी राहू शकतो का? त्यामुळे आजच्या सत्तेला लोकशाही म्हणणे म्हणजे स्वतःची फसवणूक करून घेणे आहे. ज्या प्रकारे लोकशाहीबद्दल संघाचे गुरु मा. स. गोळवलकर यांनी मांडणी केली आहे की या देशाला लोकशाहीची गरज नाही. आजची लोकशाही आमच्या प्राचीन व्यवस्थे प्रमाणे नाही. म्हणून आमची लोकशाही बद्दलची भूमिका आजच्या संविधानाप्रमाणे नाही. चातुवर्ण्य हा त्यांचा धर्म आहे आणि ही बाब मनुस्मृतीच्या (12-1) प्रकरणात स्पष्टपणे म्हटले आहे की चातुवर्ण्य हा धर्म होय आणि ब्रम्हाच्या शरीरातून चातुवर्ण्याची उत्पत्ती झाली आहे. अशा प्रकारच्या विकृत विचारसरणीला मान्य करणारी राज्यसत्ता किंवा सत्ता या देशात जारी असेल तर लोकशाही सत्ता असू शकते का? तथाकथित स्वातंत्र्य वीर सावरकर म्हणतात की, ज्या देशात चातुवर्ण्य नाही तो म्लेंच्छ देश होय आणि त्यांनी हेही म्हटले की पेशवाई ही हिंदू राष्ट्राचे रूप होते?. (पहा- सावरकर समग्र वांङ्मय व व माझे पुस्तक ‘RSS मुक्त भारत का व कशासाठी?’)- या देशांमधील बहुतांश लोक उच्चनीचतेच्या मानसिकतेत जगत आहेत. त्या जातव्यवस्थेने मानवता नाकारली आहे, माणूसपण नाकारले आहे. इथे जनावरांचे मूत्र पवित्र ठरते. पण मानवाचा स्पर्श चालत नाही. अशी विकृत भूमिका घेऊन जगणारे, वागणारे लोक इथे उच्च आणि पवित्र ठरत असतील आणि ते सत्ताधारी असतील तर तिथे खरी मानवता आहे, लोकशाही आहे असे मान्य करणे फसवणूक आहे. सत्तेची जी भूमिका म. फुले, पेरीयर रामस्वामी, डॉ. आंबेडकर, शाहू महाराज यांनी मांडली आहे ती आणि आजची स्थिती यात काही संबंध आहे का? यावरून समतावादी व्यवस्थेला त्यांचा विरोध आहे तसाच लोकशाही विचारांना आहे. जात, वर्ण भेद असलेल्या देशांमध्ये लोकशाही असू शकत नाही. अशा भूमिकेत असलेले लोकसत्तेत आहेत आणि म्हणून आज आपण लोकशाहीत जगत आहोत असे मानत असू तर आपण भ्रमात आहोत. आपण गुलामीत राहत असून स्वतंत्र असल्याच्या बाता मारत आहोत. या देशांमध्ये ना बहुजनांना सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य आहे ना इथे लोकशाही आहे. इथे जात उतरंडीप्रमाणे व्यवहार जारी आहेत. त्यामुळे अस्पृश्यता, क्रूरता, अन्याय, भेदभाव जारी आहे तो एक प्रकारचा जात फॅसिझम आहे. म्हणून लोकांनी या लोकशाही कशी निर्माण होईल या देशांमधली जाती व्यवस्था कशी नष्ट होईल यावर विचार करायला पाहिजे. कृती करायला पाहिजे. आज जे काही होत आहे ते मनुस्मृतीप्रमाणे कसे होईल याकडे या सत्तेची वाटचाल आहे. ही मनुवादी फॅसिझमची वाटचाल आहे. ■■

“ विचार हे भांडवल, उद्योग हे मार्ग तर कठीण परिश्रम हे उत्तर आहे. ”
डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम



# एकत्र येणार आहेत का की इतिहासात हरवणार ?

**आंबेडकरी चळवळीतील मान्यवर नेते, कार्यकर्ते आणि माझ्या संघर्षशील युवकांनो, आज हा प्रपंच कोणालाही खुश करण्यासाठी नाही, किंवा स्वतःच्या उदो उदो करण्यासाठी नाही, तर समाजातील अस्वस्थ प्रश्न विचारण्यासाठी करत आहे. आज माझे मत आपणास कडवट नक्कीच वाटेल, पण सत्य नेहमी कडवटच असते!**




**पहिला प्रश्न :-** राजकीय नेते डॉ. बाबासाहेबांचे नाव विकतो की विचार जपतो? आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो बॅनरवर मोठे आहेत. पण त्यांच्या विचारांना आपल्या निर्णयात किती जागा आहे? डॉ. बाबासाहेबांचे नाव घेऊन आपण कार्यक्रम करतो, पण डॉ. बाबासाहेबांचे विचार घेऊन आपण किती वेळा एकत्र बसतो? हा प्रश्न प्रत्येक नेत्याने स्वतःला विचारला पाहिजे.

**दुसरा प्रश्न :-** शत्रू बाहेर आहेत की आपल्यातच? आज आरक्षणावर हल्ले होत आहेत, संविधान कमकुवत करण्याचे प्रयत्न होत आहेत, दलित - वंचितांवर अन्याय वाढत आहेत. बेरोजगारी वाढत आहे, सुशिक्षित मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत, आपले हक्काचे प्रसारमाध्यम नाही, असे अनेक प्रश्न आहेत. पण आपण काय करत आहोत? आपण एकमेकांच्या पोस्टवर टीका करत आहोत, एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत आहोत, एकमेकांच्या कार्यक्रमांवर पाणी टाकत आहोत! शत्रू बाहेर नाहीत का? की... आपणच एकमेकांचे शत्रू झालो आहोत?

**तिसरा प्रश्न :-** नेतृत्व म्हणजे काय? नेतृत्व म्हणजे समाजासाठी स्वतःचा अहंकार बाजूला ठेवणे! आज किती नेते आहेत जे म्हणतात, 'मी मागे राहीन, पण चळवळ पुढे जावी?' आज किती नेते आहेत, जे एकत्र व्यासपीठावर यायला तयार आहेत? जर हे होत नसेल, तर आपण नेते आहोत की अडथळे? कटू सत्य :- फुट ही आपली हत्या आहे. आपण स्वतःच आपल्या चळवळीची हत्या करत आहोत! फुट म्हणजे कमकुवतपणा आणि कमकुवतपणावरच अन्याय करणारे राज्य करतात. इतिहास साक्षी आहे. जे एकत्र आले, ते जिंकले; जे फुटले, ते संपले! आपण कोणता इतिहास घडवणार आहोत? चौथा प्रश्न :- तरुण कुठे जात आहेत? माझ्या तरुण मित्रांनो, तुम्हाला विचारतो - तुम्ही अभ्यास करत आहात का, की फक्त नेत्यांच्या पोस्ट शेअर करत आहात? तुम्ही संघटना बांधत आहात का, की फक्त गटबाजी करत आहात? जर तरुण दिशाहीन झाला, तर चळवळ पोरकी होते! आता नाही तर कधी? आदरणीय नेत्यांनो, ही शेवटची घंटा आहे! आज जर आपण एकत्र आलो नाही, तर पुढच्या पिढीला सांगायला आपल्याकडे काय उरेल? डॉ. बाबासाहेबांनी संविधान दिले, आपण काय दिले? त्यांनी एक समाज घडवला, आपण तो समाज तोडला का? इतिहास माफ करणार नाही. यावर उपाय स्पष्ट आहेत. आंबेडकरी चळवळीतील नेत्यांना, कार्यकर्त्यांना, मतदारांना आवाहन? राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकीच बिगुल वाजला आणि सर्व राजकीय पक्षप्रमुख आपल्या पदाचा वापर करून उमेदवारी निश्चित करण्यासाठी सज्ज झाले आहेत. प्रदेशाध्यक्ष यांनी आपल्या अधिकृत प्रभाग व वार्डाकरीता उमेदवाराच्या मुलाखती घेण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. असा धुमाकूळ प्रत्येक राजकीय पक्षात सुरू आहे. अनेक राजकीय पक्षाने फक्त सत्ता मिळवण्यासाठीच सामान्य जनतेच्या भावनांना तिलांजली देऊन, ज्या नेत्यांची जाहीरपणे अगदी खालच्या पातळीवरून निर्लज्जपणे शिव्याशाप देत होते, त्यां दोघांच्यामध्ये विस्तवसुद्धा जात नव्हते असे नेते फक्त सत्ता मिळवण्यासाठी सामान्य जनतेच्या भल्यासाठी नाही तर फक्त आपल्या स्वार्थासाठी एकत्र येत आहेत. यात आमचे आंबेडकरी नेते आणि कार्यकर्ते कुठे आहेत. आपण का एकत्र येऊ शकत नाही, याचा विचार करावा. आदरणीय आंबेडकरी चळवळीतील नेते, विचारवंत, कार्यकर्ते आणि युवा सहकाऱ्यांनो, हे अशक्य नाही फक्त इच्छाशक्ती हवी! बघा पटत असेल तर मनपा निवडणूक प्रभाग रचनेनुसार आहे. एका प्रभागात किमान तिन ते चार वार्ड समाविष्ट आहेत, तेव्हा 'एक वार्ड एकच आंबेडकरी पक्षाचा उमेदवार' असे समीकरण करता येईल. एका प्रभागात तिन ते चार आंबेडकरी पक्षांना जर मतदान केले तर, सविस्तरपणे सांगतो, एका प्रभागात चार वार्ड आहेत. तेव्हा एका वार्डात एक आंबेडकरी पक्षाचा एकच उमेदवार देवून त्यालाच मतदान करायला पाहिजे. त्या वार्डात दुसरा आंबेडकरी पक्षाचा उमेदवार उभा करायचा नाही. तर त्याला दुसऱ्या वार्डातील उमेदवारी देवून त्याला मतदान करायचे म्हणजेच एका वार्डात बहुजन पक्षाचा उमेदवार असल्यास त्या वार्डात इतर आंबेडकरी पक्षाचा म्हणजे वंचित, रिपब्लिकन किंवा तत्सम पक्षाचा उमेदवार नको. तसेच त्याच प्रभागातील दुसऱ्या वार्डात वंचित पक्षाचा उमेदवार असेल तर तिथे बहुजन, रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार नको. तसेच त्या वार्डातील सर्व आंबेडकरी जनतेनी व इतर आंबेडकरी पक्षांनी एकत्र मिळून त्यांच्याच प्रचार-प्रसार करून मतदान करावे. अश्या प्रकारचे नियोजन केल्यास प्रत्येक आंबेडकरी विचाराच्या पक्षाला प्रतिनिधित्व मिळेल. मग ते वंचित, बहुजन, रिपब्लिकन, किंवा अन्य तत्सम पक्षांचे असो. आणखी एक महत्वाचे म्हणजे प्रत्येक पक्षांच्या प्रदेशाध्यक्ष यांनी पुढाकार घेऊन आपल्या राष्ट्रीय नेत्याला समजून सांगावे कि ही निवडणूक आमच्या वस्तीची, मोहल्यातील समाजासाठी व त्यांच्या कल्याणासाठी, विकासासाठी आहे. आपल्या पक्षाच्या वाढीसाठी नाही. तेव्हा आपण या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हस्तक्षेप करू नये. अशी भूमिका घेऊन केल्यास डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीला योग्य दिशा मिळेल. त्यामुळे हि निवडणूक केवळ राजकीय स्वार्थासाठी नाही तर आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरेल. मागील अनेक वर्षापासून प्रत्येक निवडणुकीत राजकीय एकत्रितकरणाचे प्रयत्न होताना दिसतात. मात्र राष्ट्रीय पक्षप्रमुख स्वतःच्या राजकीय स्वार्थापोटी समाजाला एकत्र येऊ देत नाही. म्हणूनच आता समाजाने स्वतःच पुढाकार घेऊन एकीची चळवळ सुरू करून अश्या नेत्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. हे सर्व प्रयत्न यशस्वी करण्यासाठी समाजातील जेष्ठ मंडळीने एकत्र येऊन प्रयत्न केल्यास नक्कीच यश मिळेल. आता हि वेळ अतिशय महत्त्वाची आहे. जर समाजातील जेष्ठमंडळी यांनी आताच पुढाकार घेऊनच समोर आले नाही तर मग येणाऱ्या काळात आपल्या नंतरच्या पिढीला फार कठीण होईल व यासाठी आपण दोषी असू याची जाणीव ठेवावी. आता प्रत्येक वस्तीतील जेष्ठ महिला/पुरूषानी आपल्या वस्तीत बैठका घेऊन आपल्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी कोण पात्र असेल याची सर्वानुमते खात्री करूनच उमेदवार निवडावे. यात राजकारण नातेसंबंध व पोटजातीला महत्व न देता समाजाला पोषक वातावरण निर्माण करावे यात कोणतीही शंका अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. हे करताना समाजातील जेष्ठ नागरिक हेच योग्य मार्गदर्शन करू शकतील तेव्हा ज्येष्ठांनो आपण आपल्या रोजच्या जीवनातील काही काळ सामाजिक कार्यासाठी राखीव ठेवा. आपण आजपर्यंत नेहमीच आपले आरोग्य स्वास्थ्य जपण्यासाठी प्रयत्नशील असतोच. पण त्याचबरोबर आपल्या सामाजिक जीवनातील अनेक समस्या देखील दूर करण्यासाठी प्रयत्न करणे तितकेच गरजेचे आहे. अंतिम प्रश्न आणि आवाहन आज मी शेवटचा प्रश्न विचारतो. आपण डॉ. बाबासाहेबांचे वारसदार आहोत की फक्त फोटोचे भक्त? आज इथे बसलेला प्रत्येक नेता, कार्यकर्ता, व्यक्ती जर एक पाऊल मागे सरकला, तर चळवळ दहा पावले पुढे जाईल! चला तर मग, स्वतःसाठी नाही. समाजासाठी उभे राहूया! गटासाठी नाही - विचारासाठी लढूया! नेतृत्वासाठी नाही - इतिहासासाठी जगू या! ■ ■



नरेश साखरे
मो. 9923086515

## मोलाचा सल्ला

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

मोठ्या अधिकारी पदभरतीमध्ये ज्या तरूणांची ऊच्चपदी निवड झाली होती त्यांच्या अभिनंदनासाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बोलतांना सर्वोच्च पदावर असलेला अधिकारी म्हणाला, सर्वप्रथम मला आज तुमचे अभिनंदन करतांना आनंद होत आहे. तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देतांना मी एवढेच सांगतो की, आज मी तुम्हाला कार्यालयीन कामकाजा विषयी काहीही सांगणार नाही पण मी माझ्या मनातल्या काही भावना व्यक्त करतो. आज तुम्ही ज्या उच्च पदावर पोहचले आहात त्या पदापर्यंत पोहोचण्यासाठी तुमच्या आईवडिलांनी कितीतरी कष्ट उपसले आहेत. ज्या कुणाचे आईवडिल आर्थिकदृष्ट्या गरीब असतील, कमी शिकलेले असतील त्यांना आयुष्यात कधीही 'तुम्ही माझ्यासाठी आयुष्यात काय केले आहे? असा प्रश्न चुकुनही विचारू नका. कारण त्यांनी त्यांचे ऊभे आयुष्य तुम्ही मोठे व्हावे म्हणून खर्च केले आहे. आपल्या पदाचा कधीही अहंकार बाळगु नका कारण जेव्हा अहंकार जन्म घेतो त्यावेळी नाते मृत पावतात. तुमचे मायबाप, कुटुंबातील मंडळी रखरखत्या उन्हात ह्या विश्वासाने करपत असतात की, जर आम्ही जळत राहीलो तरच कुटुंबात प्रकाश पडेल. ही त्यांची भावना आहे. अशा आईवडिलांकडे दुर्लक्ष करू नका. त्यांनी आवाज देताच हाकेला ओ द्या. ते बरेचदा तुम्हाला काही काम नसतांनाही आवाज देतील त्यामागे तुम्हाला खुश बघणे एवढाच त्यांचा उद्देश असतो. वेळात वेळ काढुन त्यांच्याजवळ बसा. त्यांच्याशी गप्पागोष्टी करा. तुम्हालाही तुमचे बालपण परत आल्याचा आनंद होईल. तुम्ही मोठे अधिकारी आहात पण आजवर तुमचे मित्र आणि नातेवाईक जर सर्वसामान्य परिस्थितीत असतील तर त्यांना कमी लेखु नका. त्यांचा पुर्वी इतकाच सन्मान करा. माझ्या तरूण मित्रांनो! एक गोष्ट लक्षात ठेवा की, नाते आणि बर्फ ह्यांचे गुणधर्म सारखेच असतात. त्यांना बनवणे फार सोपे असते पण टिकवून ठेवणे फार कठीण असते. या दोन्ही गोष्टींना जर सांभाळून ठेवायचे असेल तर त्यासाठी फक्त एकच मार्ग आहे तो मार्ग म्हणजे कायम शितलतेचे जतन करणे. क्रोध आणि गरमी ह्या दोन बाबींमुळे नाते आणि बर्फ कायमचे नष्ट होते. तुमच्या आयुष्याला नुकतीच पालवी फुटली आहे. म्हणून एका गोष्टीचे सतत भान असु द्या की, तुमच्याकडून कोणत्याही मानवरूपी मोठ्या वृक्षाची हेटाळणी होता कामा नये कारण त्यांनी जो ऊन, वारा, पाऊस, थंडी आणि वादळाचा सामना केला आहे तो तुम्ही अद्याप केलेला नाही. शेवटी एकच अपेक्षा करतो की, ज्यांनी ज्यांनी समर्पित वृत्तीने तुम्हाला मदत केली असेल त्यांच्यावर पश्चातापाची वेळ येणार नाही ह्याची काळजी घ्या. जे काही आज तुम्हाला मिळले आहे त्याचा गर्व कधीही बाळगू नका कारण जी नियती हे भाग्य देऊ शकतो ती नियती तुमच्याकडून हिरावून देखील घेऊ शकते. याचा विसर पडू देऊ नका निःस्वार्थी मित्र, सहकारी, कुटुंब तसेच तुमच्यावर जिवापाड प्रेम करणारे मायबाप हे एखाद्या वटवृक्षाच्या सावली सारखे असतात. एकदा का हे वटवृक्ष उन्मळून पडले तर आयुष्यभर वाळवंटाच्या रखरखीत वातावरणात रहावे लागेल म्हणून नात्यांना जपा. कुडीतील प्राणासारखे जपा. बाकी कामकाजाच्या इतर गोष्टी बाबत पुढे बोलतच रहाणार आहो. तुर्तास एवढेच. तुम्हाला आभाळभर शुभेच्छा ■ ■

बहुजन सौरभ

# बार्टी एक समता प्रस्थापित करणारी सामाजिक चळवळ!

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात बार्टी या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त प्रशिक्षण व संशोधन संस्थेचा 22 डिसेंबर हा 47 वा वर्धापन दिन. या वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कार्यावर टाकलेला प्रकाश...**

महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अनेक चळवळी उदयास आल्या. काही काळपुरत्या, काही क्षणिक, तर काही दीर्घकाल टिकून राहणाऱ्या. पण बार्टी, अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ही संस्था नव्हे तर ती एक समता प्रस्थापनेसाठी जणू चळवळ म्हणून काम गेल्या 47 वर्षापासून अनुसूचित जातींसाठी काम करीत आहे आहे. ही संस्था केवळ एका विषयापुरती मर्यादित नाही; तर शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन, लेखन, मूल्यमापन, सामाजिक न्याय, समता आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवन यांचा संगम आहे. त्यामुळेच बार्टी ही संस्था नसून एका विचारसरणीची सतत चालती-बोलती मोहीम आहे. बार्टीच्या स्थापनेमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भक्कम पाया आहे. महाराष्ट्र शासनाने सामाजिक समता या विषयावर सखोल अभ्यास, संशोधन व प्रशिक्षणाचे कार्य व्हावे या उद्देशाने या संस्थेची 1979 मध्ये मुंबईमध्ये स्थापना केली. पुढे ही संस्था 1987 मध्ये पुण्यात स्थलांतरित झाली. या संस्थेच्या दैनंदिन कामकाजामध्ये स्वायत्तता यावी व संस्थेचे काम अधिक जलदगतीने व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने सन 2008 मध्ये या संस्थेला यशदा या प्रशिक्षण संस्थेसारखा स्वायत्तेचा दर्जा दिला. बार्टीच्या धर्तीवर आज विविध समाजाच्या उत्कर्षासाठी अनेक संस्था उदयाला आलेल्या आहेत. त्यामध्ये सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांचा समावेश आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे नियामक मंडळ स्थापन करण्यात आले असून त्यांच्या नियंत्रणाखाली संस्थेचे कामकाज सुरू आहे. त्याचबरोबर या नियामक मंडळामध्ये विविध खात्यातील सुमारे 10 वरिष्ठ सनदी अधिकारी यांचा समावेश आहे. संस्थेने 47 वर्षात अनेक महत्वपूर्ण काम केली आहेत. अलीकडे संस्थेचा व्यापक विस्तार झाला असून संस्थेची ध्येय, उद्दिष्ट याप्रमाणे विविध सामाजिक समतेशी निगडित संशोधन प्रकल्प, वंचित घटकासाठी काम करणारे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांना प्रशिक्षण, सामाजिक न्याय विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची प्रशिक्षणाद्वारे क्षमतावृद्धी, सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे मूल्यमापन, विविध स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य, उद्योजकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम, ॲट्रॉसिटी ॲक्ट कायद्याची जाणीव जागृती, त्याचबरोबर महापुरुषांच्या कार्याचा जागर व्हावा यासाठी अनेक कार्यक्रम, उत्सव या संस्थेच्या माध्यमातून होतात.




समाजातील वंचित, पीडीत, उपेक्षित माणसाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांचाच विचार पुढे नेण्याचे काम ही संस्था करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संबंधित महाड येथील चवदार तळे येथील स्मारक, येवला येथील प्रेरणाभूमी, स्मारक याची देखभाल व दुरुस्ती व तसेच येथे अनेक समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्याची जबाबदारीही या संस्थेकडे आहे.

वंचित, मागास, आणि आर्थिक स्थितीने दुर्बल असलेल्या तरुणांना केवळ स्वप्ने दाखवणे नाही, तर त्यांच्या स्वप्नांना बळ देणे व त्यांना स्वप्नांच्या दिशेने नेणे, त्याची वाट दाखवणे हे काम बार्टी सातत्याने करते.

बार्टीचा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठा प्रकल्प आहे तो राजधानी दिल्ली सह राज्यभर विस्तारला आहे. बार्टीने स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण सुरू केले, तेव्हा हा उपक्रम फार मोठा आणि धाडसी होता. UPSC-MPSC सारख्या परीक्षांसाठी लाखो रुपये खर्च होतात, कोचिंगची सुविधा सहज सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांसाठी मिळत नाही. पण बार्टीने हे सर्व मोफत उपलब्ध करून दिले. योग्य मार्गदर्शन, अभ्यास साहित्य, तज्ज्ञ प्राध्यापक, निवासी प्रशिक्षण व शिस्तबद्ध वातावरण यामुळे महाराष्ट्रातील हजारो तरुणांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. एखाद्या तरुणाचे आयुष्य बदलणे म्हणजे त्याच्या कुटुंबाच्या आणि पुढच्या पिढ्यांच्या भविष्यामध्ये प्रकाश पेरणे होय. अशी हजारो घरात प्रकाश पेरण्याचे व त्या घरांना उजळवण्याचे काम बार्टीने केले आहे. हीच सामाजिक जागृती आणि सक्षमीकरणाची खरी चळवळ आहे. त्यात बार्टी झोकुन देऊन काम करत आहे. सामाजिक संशोधन हे बार्टीचे दुसरे मजबूत अंग आहे. विविध जाती, समाजांची शैक्षणिक स्थिती, आर्थिक प्रगती, रोजगार, आरक्षणाची अंमलबजावणी, सामाजिक विषमता, ग्रामीण-शहरी तफावत, तरुणांचे कौशल्य या आणि अशा अनेक विषयांवर बार्टीने संशोधनात्मक अभ्यास केला. धोरणनिर्मिती करणाऱ्यांना दिशा देणे, समाजातील समस्या वैज्ञानिक पद्धतीने ओळखणे आणि त्यावर उपाय सूचवणे ही परिवर्तनाची बौद्धिक बाजू आहे. त्यामुळे बार्टी आपल्या संशोधन विभागामार्फत अनेक संशोधन प्रकल्प राबवून हे काम करीत आहे.

आर्थिक सबलीकरण हा सामाजिक समतेचा मुख्य पाया आहे. फक्त नोकरीच्या संधी वाढविल्या जाऊन समाज बदलत नाही, तर तरुणांनी स्वयंरोजगार, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातही उतरले पाहिजे. त्यासाठी बार्टीने अनेक उद्योजकता विकास कार्यक्रम राबवले, तरुणांना वित्तीय ज्ञान दिले, स्टार्टअप सुरू करण्याचे कौशल्य शिकवले आणि उद्योग उभारण्यासाठी आवश्यक मानसिकता निर्माण केली. आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे म्हणजे सामाजिक साखळ्या तुटणे आणि स्वतःचे भविष्य स्वतः घडवणे. ही प्रक्रिया वेगाने वाढत आहे आणि बार्टीची ही चळवळ गावोगावी पोहोचत आहे. तरुणांना उद्योगाकडे वळविण्यासाठीही बार्टीचा मोठा सहभाग आहे.आज कौशल्य विकास विभागामार्फत असे अनेक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू आहेत. त्याचबरोबर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीही संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण, शिष्यवृत्ती दिली जाते त्यामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी जेईई, नीट, अभियांत्रिकी, न्यायालयीन सेवा, स्टाफ सिलेक्शन, लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा समावेश आहे. दरवर्षी संस्थेमार्फत हजारो विद्यार्थ्यांना याचा फायदा होतो. त्याचबरोबर मुख्य परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीला तोंड देण्यासाठी आर्थिक सहाय्य ही संस्था करते. त्याचबरोबर शिव, फुले- शाहू, आंबेडकरी, अण्णाभाऊ साठे साहित्य निर्मितीसाठी तसेच हे साहित्य अत्यंत अल्प किमतीमध्ये सर्वदूर सर्वसामान्य लोकांपर्यंत कसे पोहोचेल, यासाठी बार्टीचा विस्तार व सेवा तसेच प्रकाशन प्रसिद्धी विभाग प्रयत्नरत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान आणि ज्या संविधानामुळे संबंध देश एकसंध आहे त्या संविधानाचा प्रचार- प्रसार देशात जर सर्वाधिक कोणी केला असेल तर तो बार्टी या संस्थेने. या संस्थेने आतापर्यंत लाखो संविधानाच्या प्रति अत्यंत कमी दरात लोकांपर्यंत पोहोचविल्या आहेत. यासाठी स्वतंत्र भांडार निर्माण केले आहे. संविधानिक मूल्यांचा प्रसार तसेच समाजातील अज्ञान, अंधकार, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा नष्ट करण्याचे कामही संस्थेचे सुमारे 300 समतादूत करीत आहेत तसेच शासनाच्या विविध योजनांचा प्रचार- प्रसार करण्याचे कामही राज्यभर हे समतादूत रोज करतात. व्याख्याने प्रबोधनाचे कार्यक्रम, प्रकाशने, ग्रंथालय सेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, संशोधनपर ग्रंथ, डॉ. आंबेडकरांच्या विविध पैलूंचा तसेच छत्रपती शिवाजी महाराज, छ. शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचे काम संस्था सातत्याने करते. अशा कार्यक्रमांमुळे नव्या पिढीत सामाजिकता, बौद्धिकता वाढत आहे. यातून समाजाचे विचारविश्व बदलले तरच समाज बदलतो या तत्वावर बार्टी उभी आहे.

आजची बार्टी डिजिटल पिढीसाठी नवे आयाम उघडत आहे. ऑनलाईन कोर्सेस, डिजिटल प्रशिक्षण मॉड्यूल्स, व्हर्च्युअल क्लास, वंचित विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट-आधारित संधी निर्माण करणे हे सर्व आधुनिक उपक्रम सामाजिक परिवर्तनाची, नव्या युगाची आहेत. पूर्वी गावात कोणी आयएएस अधिकारी पाहिला नसेल, पण आता त्या गावातीलच एखादा मुलगा किंवा मुलगी आयएएस अधिकारी होऊन परत जाते आणि समाजातील इतर मुलांसाठी प्रेरणा ठरते. हे परिवर्तन सहज घडत नाही, त्यासाठी काही संस्था, माणसे काम करत असतात. यामध्ये बार्टी अग्रेसर आहे. बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना थेट दिल्लीमधील नामवंत क्लासेसमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते या संस्थांच्या माध्यमातून अनेक जण केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आयएएस, आयपीएस, सनदी अधिकारी झाले आहेत. यात बार्टीची मोठी भूमिका आहे. संस्थेच्या माध्यमातून पीएचडीसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही फेलोशिपच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिले जाते, यामुळे अनेक जण उच्चविद्याविभूषित व पीएचडी धारक बनले आहेत. बार्टी अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी, त्यांच्या उत्थानासाठी संस्थेचे प्रेरणास्थान व सामाजिक न्याय खात्याचे मंत्री ना. संजय शिरसाठ, खात्याचे प्रधान सचिव मा. डॉ. हर्षदीप कांबळे व बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाने निरंतरपणे चौफेर वाटचाल करत आहे.



डॉ. बबन जोगदंड
9823338266

अनेक योजनांमुळे बार्टीने समाजात स्वाभिमानाची परंपरा निर्माण केली. 'मी काही करू शकतो', 'माझ्याकडेही क्षमता आहे', 'माझेही स्थान आहे', हा आत्मविश्वास जेव्हा एखाद्या वंचित समुदायात जागा होतो, तेव्हा तो समुदाय चळवळीत सामील झाल्याशिवाय राहत नाही. बार्टीने निर्माण केलेली ही मानसिक क्रांतीची मशाल तिची सर्वांत मोठी उपलब्धी आहे. अलीकडे काही जण जाणीवपूर्वक बार्टीचे नाव मलीन करण्याचा प्रयत्न करतात, पण त्यांनी सकारात्मक काम केले हेही जाणून घेतले पाहिजे. असे माझे मत आहे.

बार्टी ही संस्था सरकारी कार्यालय नसून समाजाचा मानबिंदू आहे. तिच्या उपक्रमांतून होणारा बदल केवळ व्यक्तीपुरता मर्यादित नाही, तर तो कुटुंब, समाज, प्रदेश आणि राज्याला स्पर्श करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, शिक्षणाची कास धरलेले भविष्य आणि समानतेवर आधारित सामाजिक बांधणी हे सर्व घटक या संस्थेनं पुढे नेले आहेत. बार्टी केवळ एका विषयावरच काम करत नाही तर अनेक विषय घेऊन बार्टी काम करत आहे. बार्टीने आपल्या कार्याच्या विविध कक्षा रुंदावल्या आहेत. संस्थेने अनेक समविचारी सरकारी संस्था, इतर राज्यातल्या संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करारही केले आहेत. खरे तर संस्था आज विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावत आहे, त्यामुळेच अनेक होतकरू व गरीब विद्यार्थ्यांचे संस्थेमुळे स्वप्न साकार झालीत, त्यामुळेच समता, शिक्षण, संशोधन, आर्थिक प्रगती आणि सामाजिक न्याय यांचा अखंडित प्रवाह बनली आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचा हा आधुनिक अध्याय बार्टीशिवाय अपूर्णच राहील. ■ ■

# बुद्ध धम्म आणि मानवाधिकार - मनुष्यत्वाचा सर्वोच्च आदर्श

**मानवाधिकार ही आधुनिक संकल्पना असली तरी तिचा नैतिक पाया बुद्ध धम्मात प्राचीनकाळीच दृढ झाला होता. बुद्धांनी मनुष्याला जात, वर्ण, लिंग, कुल, धर्म आणि प्रदेश यापेक्षा मानव म्हणून पाहिले. त्यांच्यासाठी प्रत्येक जीवात प्रज्ञेची क्षमता आहे आणि म्हणूनच प्रत्येकाला स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेचा हक्क आहे.**




वासे सुत्तात बुद्ध म्हणतात, 'श्रेष्ठत्व आचरणाने येते, जन्माने नाही.'
अंब सुत्त जात अभिमानाचा पराभव करून मानवी सन्मानाचा ध्वज प्रस्थापित करते.
कालाम सुत्त विचारस्वातंत्र्य देतो - 'विश्वास अंधपणे नको; विवेकाने निवडा.'
मेत्ता सुत्त समाजास प्रेम, अहिंसा आणि मैत्री या भावनांची लोकशाही शिकवतो.
महापजापती गौतमी प्रसंग स्त्री-पुरुष समानतेचा क्रांतिकारी मूलाधार आहे.
सिगालोवाद सुत्त कुटुंब, कामगार आणि समाज यांच्यातील परस्पर अधिकारांची प्रणाली देते.
चक्कवत्ती सिहनाद सुत्त शासकांवर लोककल्याणाची जबाबदारी ठेवतो.
संघ निर्णय प्रणाली बहुमत, मुक्त चर्चा आणि कायद्यापुढील समानता यांची हमी देणारी लोकशाही आहे.
पतिमोक्ख विनय दाखवतो - विशेषाधिकार नाहीत; नियम सर्वांसाठी समान.
धम्मपद सांगतो, 'दुसऱ्याला ज्याचे दुःख होईल ते स्वतः करू नका.' मानवाधिकारांचा शाश्वत कायदा.
'अहिंसा, करुणा, सत्य, प्रज्ञा आणि संयम' हे पाच स्तंभ मानवी स्वातंत्र्याचे रक्षण करतात.
भूत, वर्तमान व भविष्यकाळात बुद्धांचा धम्म आहे मनुष्यत्वाला सर्वोच्च स्थान.
त्यांच्याकडे देवाधारित आज्ञा नाहीत. परंतु मानवाचे स्वाभिमान, स्वातंत्र्य व सुख ही सर्वोच्च नीती आहे.
मानवाला निरीक्षणाचा अधिकार, शंका करण्याचा अधिकार आणि बदलण्याचा अधिकार तिथे मान्य आहे. धर्म म्हणजे गुलामी नाही; धर्म म्हणजे भयमुक्त जीवनाची वाट. मानवाधिकार कायद्यांनी राखले जातात घडवतो. बुद्ध धम्म मनाने जिथे मानवाचा सन्मान सर्वोच्च, तिथेच खरा धम्म आणि खरा लोकशाही समाज जन्मतो. ■ ■



नितीन प्रल्हाद अंभोरे
मो. 8956107061

# जगातील सर्वश्रेष्ठ बुद्ध धम्म

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जगामध्ये आजवर जेवढे धर्म उदयास आले आणि त्यांचे धर्मसंस्थापक झाले, त्यापैकी चार धर्मसंस्थापकांच्या धर्मांचा प्रचार केवळ भूतकाळातच नव्हे, तर आजही जगभर झाला असून, आजही जगातील अफाट लोकसंख्येवर त्यांचे प्रभुत्व आहे. ते धर्मसंस्थापक म्हणजे बुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर आणि कृष्ण. या चौघांच्या व्यक्तिमत्त्वाची व धर्मप्रसाराच्या पद्धतीची तुलना केली असता, एका बाजूला बुद्ध आणि दुसऱ्या बाजूला उरलेले तिघे यांच्यात परंपरागत दृष्टिकोनातून मोठी तफावत व विरोधाभास आढळून येतो.**

आत्मस्तुती व अहंभाव यांपासून अलिप्तता हे वैशिष्ट्य या चौघांपैकी केवळ बुद्धामध्येच दिसून येते. बायबलमध्ये येशू ख्रिस्त स्वतःला देवाचा पुत्र असल्याचे ठामपणे सांगतो. तसेच, देवाच्या राज्यात म्हणजेच स्वर्गात प्रवेश मिळवायचा असेल, तर त्यावर विश्वास ठेवणे आवश्यक असल्याचे तो सांगतो. अन्यथा स्वर्गप्रवेश मिळणार नाही, अशी त्यांची भूमिका आहे. महंमद पैगंबर यांनी ख्रिस्तापेक्षाही एक पाऊल पुढे टाकत स्वतःला अल्लाहचा संदेशवाहक, म्हणजेच पैगंबर म्हणून मान्यता दिली आणि स्वतःला शेवटचा पैगंबर घोषित केले. कृष्णाने तर येशू ख्रिस्त व महंमद पैगंबर यांच्या पुढे दोन पावले टाकली आहेत. ईश्वराचा दूत किंवा शेवटचा पैगंबर असे न म्हणता, त्यांनी स्वतःला परमेश्वर, म्हणजेच देवाधिदेव म्हणून मांडले. सर्वांनी केवळ त्यांचीच पूजा व आराधना केली पाहिजे, असे सांगून त्यातूनच मुक्ती व स्वर्गप्राप्ती होईल, असा संदेश दिला.

परंतु बुद्धांनी स्वतःला कोणतीही विशेष उपाधी दिलेली नाही. ख्रिस्त, पैगंबर किंवा कृष्ण यांसारखा अहंभाव बुद्धांनी कधीही बाळगलेला नाही. त्यांनी स्वतःला मानवाचा पुत्र व एक सर्वसाधारण मनुष्य म्हणूनच मांडले. कोणताही अलौकिक किंवा चमत्कारिक दर्जा सांगून लोकांना लालूच न दाखवता, त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा व धम्माचा प्रचार केला. तथागत बुद्धांनी मार्गदाता व मोक्षदाता यांतील फरक स्पष्टपणे मांडला. ख्रिस्त, महंमद पैगंबर व कृष्ण यांनी स्वतःला मोक्षदाता मानले; तर बुद्धांनी स्वतःला मार्गदाता म्हटले. या तिघांनी 'आम्ही सांगितल्याप्रमाणे वागाल, तरच मुक्ती मिळेल' अशी भूमिका घेतली; परंतु बुद्धांनी असा कोणताही अचूकतेचा दावा केला नाही. महापरिनिर्वाण सुत्तामध्ये आनंदाला उपदेश करताना बुद्ध म्हणतात की, 'माझा धम्म तर्क बुद्धिवाद व अनुभवाच्या आधारावर उभा आहे. मी सांगतो म्हणून माझ्या अनुयायांनी तो सत्य म्हणून स्वीकारू नये; तर स्वतःच्या तर्क बुद्धीच्या कसोटीवर तपासून पाहावा. काळानुसार व परिस्थितीनुसार सुसंगत वाटत नसेल, तर तो बदलण्याचा अधिकारही त्यांनी ठेवावा.' सदाहरित वृक्षाप्रमाणे त्यांचा धम्म चिरकाल टिकावा, हीच त्यांची अपेक्षा होती.




बुद्ध धम्माची विचारसरणी काय होती, बुद्ध तत्त्वज्ञान कसे होते आणि आजच्या प्रस्थापित धर्मांच्या तुलनेत बौद्ध धम्माचे स्थान काय आहे, हे समजून घेणे अत्यावश्यक आहे. हिंदू धर्म व बुद्ध धम्म यांची तुलना केली असता, स्पष्ट होते की बुद्ध धम्माची प्रमुख आधारशिला नीतिमत्ता आहे, तर इतर धर्मांत ईश्वराला प्रमुख स्थान आहे. बौद्ध धम्मात ईश्वराला मुळीच स्थान नाही; त्याऐवजी नीतिमत्ता, सदाचार व नैतिक मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले आहे. इतर धर्मांमध्ये पूजा-अर्चा, यज्ञ, जप-जाप व कर्मकांड यांना महत्त्व दिले जाते; परंतु बुद्धांनी अशा कर्मकांडांना आपल्या धम्मात स्थान दिलेले नाही. दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे, हिंदू धर्म विषमतेचा पुरस्कार करणारा आहे. चातुवर्ण व्यवस्था ही विषमतेची मूलभूत आधारशिला आहे. याउलट, बुद्ध धम्म समतेचा पुरस्कार करतो. बुद्ध हे चातुवर्ण व्यवस्थेचे कट्टर विरोधक होते. त्यांनी केवळ प्रचारच केला नाही, तर तिची मुळे उपटून टाकण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्मशास्त्रांनी शूद्र व स्त्रियांना विद्या व संन्यासाचा अधिकार नाकारला. परंतु बुद्धांनी असे कोणतेही बंधन घातले नाही. त्यांनी स्त्रियांनाही भिक्षु संघात सामावून घेतले व भिक्षुणी संघाची स्थापना केली. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही समान अधिकार दिले. बुद्धांच्या या भूमिकेमुळे विषमता नष्ट करण्याचा त्यांचा उद्देश स्पष्ट होतो. चातुवर्णाच्या विरोधात बुद्धांनी उठवलेला आवाज दाबण्यासाठी हिंदू धर्माने नव्या तर्काच्या आधारे चातुवर्णाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला, जो सर्वप्रथम भगवद्गीतेत करण्यात आला. वेदांच्या अपृष्यात्वावर व अपरिवर्तनशीलतेवर बुद्धांनी प्रहार केल्यामुळे चातुवर्णाचा पाया हादरला. त्यामुळे तो टिकवण्यासाठी भगवद्गीतेचा आधार घेण्यात आला. मात्र या नव्या समर्थनामुळेच जातीव्यवस्थेचा जन्म झाला. बुद्धांचा धम्मच भारतीय समाजाला वाचवू शकतो. धम्म हा प्रत्येकाचा सामाजिक वारसा असतो. धर्मावर माणसाचे जीवन, स्वाभिमान व प्रतिष्ठा अवलंबून असते. म्हणूनच धर्मत्याग करणे सोपे नसते. देशप्रेमाप्रमाणेच धर्मप्रेमातही तीव्र स्वाभिमान दडलेला असतो. हिंदू धर्मातील अनिष्ट बाबींची जाणीव असूनही अनेक लोक धर्मत्यागाची हिंमत न करता विविध मार्ग शोधत राहतात. 'सर्व धर्मांत दोष आहेत' असे म्हणत स्वतःची समजूत घालणारेही आहेत. त्यामुळे बौद्ध धम्म श्रेष्ठ असतानाही अनेकांना तो स्वीकारण्याची लाज वाटते. मात्र काळाच्या ओघात हिंदू धर्माची लोकांवरची सत्ता शिथिल होईल आणि तेव्हा बौद्ध धम्म स्वीकारण्यावाचून पर्याय उरणार नाही. बौद्ध धम्म श्रेष्ठ का आहे, हे थोडक्यात सांगायचे तर, कोणतीही समाजव्यवस्था टिकवण्यासाठी तिला कायदा किंवा नीतिमत्तेचा आधार लागतो. धर्म विज्ञानाशी सुसंगत, तर्कनिष्ठ व बुद्धिवादी असला पाहिजे. तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुता या लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा स्वीकार त्याने केला पाहिजे. या सर्व कसोट्यांवर केवळ बौद्ध धम्मच पूर्ण उतरतो. बुद्ध धम्म सामाजिक, वैयक्तिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. तो समानता केवळ पुरुषांपुरती मर्यादित ठेवत नाही, तर स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट पुरस्कार करतो. बुद्धांचे तत्त्वज्ञान अत्याधुनिक असून, या जन्मातच मनुष्याला सुख, समाधान व विमुक्ती देणे हा त्यांचा धम्माचा प्रमुख उद्देश आहे; मरणोत्तर स्वर्गाच्या कल्पनेवर नाही. बुद्धांइतका तर्कनिष्ठ व मानवतावादी धर्मगुरू जगात दुसरा नाही. म्हणूनच शिक्षण प्रसाराबरोबरच आज धम्मप्रसार होणे ही तितकेच आवश्यक आहे. ■ ■



ज्योत्सना बनसोड
8766942982

